सांध्य दैनिक


# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## महाकुंभ मेळ्यात १०० हून अधिक भाविकांना हृदविकाराचा झटका; प्रशासनाच्या तयारीमुळे वाचले प्राण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२प्रयागराज**



उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे कुंभ मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळ्याला जगभरातून लाखोंच्या संख्येने भाविकांनी हजेरी लावल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान या भाविकांची काळजी घेण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक अशी सर्व खबरदारी घेतली जात आहे. महाकुंभ मेळ्यात हृदयविकाराचा झटका आलेल्या १०० हून अधिक भाविकांचा जीव वाचवण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे. तर १८३ गंभीर आरोग्याविषयी समस्या आलेल्या भाविकांना आयसीयूमध्ये उपचार मिळाले आणि ५८० जणांवर यशस्वी शस्त्रक्रिया देखील करण्यात आल्या आहेत अशी माहिती अधिकार्यांनी दिली आहे.

याव्यतिरिक्त १,७०,७२७ ब्लड टेस्ट करण्यात आल्या आहेत आणि १,००,९९८ लोकांनी ओपीडी सेवांचा लाभ घेतला आहे, असेही अधिकार्यांनी यावेळी सांगितले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेले, महाकुंभ येथील केंद्रीय रुग्णालय लाखो भाविकांची सुरक्षा आणि आणि त्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी जागतिक दर्जाची वैद्यकीय सेवा पुरवत आहे असेही प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

महाकुंभ मेडिकल व्यवस्थेचे नोडल ऑफिसर डॉ. गौरव दुबे यांनी सांगितलं की देशभरातलील तसेच जगभरातील भाविकांना दर्जेदार आरोग्य सेवा दिली जात आहे.

उपचार घेतलेल्या रुग्णांबद्दल बोलताना दुबे म्हणाले की, मध्य प्रदेशातील दोन भाविकांना छातीत दुखू लागले त्यानंतर त्याच्यावर मध्यवर्ती रुग्णालयात उपचार करण्यात आले. दोघांनांही आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले, त्यांना काही काळ निरीक्षणाखाली ठेवण्यात आले, तसेच त्यांना योग्य उपचार देण्यात आले. सध्या ते पूर्णपणे निरोगी आहेत . दुबे यांनी सांगितले की दोन्ही रुग्णांची इसीजी करण्यात आली, त्यांना मिळलेल्या प्रभावी उपचारामुळे ते लवकर बरे झाले. इतर रुग्णांमध्ये फुलापूर येथील हनुमानगंजचे रहिवासी १०५ वर्षीय बाबा राम जाने दास यांच्या पोटदुखीवर मध्यवर्ती रुग्णालयात उपचार करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले.

## केजरीवाल सरकारने ३८२ कोटी रुपयांचा आरोग्य घोटाळा केला; काँग्रेसचा धक्कादायक आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नवी दिल्ली**



दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आप आणि भाजपसह आप आणि काँग्रेसमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. अशातच, काँग्रेसचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष अजय माकन यांनी बुधवारी(२२ जानेवारी) पत्रकार परिषदेतून अरविंद केजरीवाल आणि आम आदमी पक्षावर गंभीर आरोप केले.

**आरोग्य विभागात घोटाळाचा आरोप**

अजय माकन म्हणाले की, दिल्लीबाबत कॅगच्या अहवालांपैकी एक अहवाल अत्यंत गंभीर आहे. राष्ट्रीय राजधानीत ३८२ कोटी रुपयांचा आरोग्य घोटाळा झाल्याचे या अहवालावरून स्पष्ट झाले आहे. काँग्रेसच्या राजवटीत दिल्लीत तीन रुग्णालयांचे बांधकाम सुरू झाले होते, परंतु केजरीवाल सरकारच्या काळात त्यांच्या बांधकामाला सतत विलंब होत गेला, त्यामुळे निविदांचे पैसे वाढतच गेले. केजरीवाल सरकारने या भ्रष्टाचाराबाबत उत्र द्यावे.

**'आप के पाप' मोहिमेचा शुभारंभ**

अजय माकन पुढे म्हणतात, इंदिरा गांधी रुग्णालय, बुरारी रुग्णालय आणि मौलाना आझाद दंत रुग्णालयाच्या बांधकामात भ्रष्टाचार झाला आहे. त्यापैकी सर्वाधिक ३१४ कोटी रुपयांची गुंतवणूक निविदेद्वारे इंदिरा गांधी रुग्णालयाच्या बांधकामात करण्यात आली. दिल्लीत भ्रष्टाचाराविरोधात पक्ष स्थापन केला गेला. त्यावेळी एक नेता कॅगचा अहवाल आणून काँग्रेसच्या विरोधात आवाज उठवत असे, पण आता तोच कॅग अहवाल त्यांच्या भ्रष्टाचाराबाबत सांगत आहे. आप के पाप या नावाने आम्ही सातत्याने मोहीम राबवत आहोत, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्या अनेक कंपन्यांच्या भेटी

### महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी केले निमंत्रित, टाटा समूह ३०,००० कोटी गुंतवणूक करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२दावोस**




दावोस येथील वर्ल्ड इकोनॉमिक फोरममध्ये पहिल्या दिवशी महाराष्ट्राने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ६,२५,४५७ कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले आहेत. एकाच दिवशी इतक्या मोठ्या रकमेचे करार होणे, हा एक नवा विक्रम आहे. दरम्यान आज दुसऱ्या दिवशी सुद्धा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करार होणार आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सामंजस्य करारांच्या व्यतिरिक्त अनेक कंपन्यांच्या प्रमुखांच्या भेटी घेतल्या आणि त्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी निमंत्रित केले. टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांचीही काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. टाटा समूह ३० हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे.

काल्सबर्ग समूहाचे सीईओ जेकब अरुप अँडरसन यांची त्यांनी भेट घेतली. काल्सबर्ग समूहाने महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा प्रदर्शित केली असून, त्यांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.रिटेल क्षेत्रात कार्यरत लुलू समूहाचे प्रबंध संचालक एमए युसुफ अली यांचीही देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. त्यांनी नागपुरात गुंतवणूक करण्याची इच्छा प्रदर्शित केली असून, महाराष्ट्रातही त्यांनी विस्तार करण्याची तयारी दर्शविली आहे.रिन्यू पॉवरचे अध्यक्ष आणि सीईओ सुमंत सिन्हा यांची देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली. बीड जिल्ह्यात १५,००० मेवॉ पाईपलाईन आणि पवनऊर्जा प्रकल्पाबाबत यावेळी चर्चा झाली.शिंडर इलेक्ट्रीक इंडियाचे प्रबंध संचालक आणि सीईओ दीपक शर्मा यांचीही त्यांनी भेट घेतली. जागतिक बँकेच्या मदतीने राज्यातील आयटीआयच्या सक्षमीकरण कार्यक्रमात तसेच ऊर्जा क्षेत्रात एआयच्या वापराबाबत सहकार्य करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. अहिल्यानगर आणि नाशिक येथे विस्तार करण्याच्या त्यांच्या योजनांचेही सूतोवाच त्यांनी केले.मास्टरकार्ड, एपीएसीचे अध्यक्ष लाईंग हाई यांचीही त्यांनी भेट घेतली. लुईस ड्रेफसचे सीईओ मायकेल ग्लेंची यांच्याशी शेती, अन्नप्रक्रिया, आंतरराष्ट्रीय शिपिंग आणि वित्तीय क्षेत्राबाबत मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. शेतीच्या क्षेत्रात अधिक सहकार्य वाढविण्यावर यावेळी चर्चा करण्यात आली.कॉग्निझंटचे सीईओ रविकुमार एस. यांचीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट घेतली.

## एकीकडे शिंदें 'शिवोत्सव' साजरा करणार दुसरीकडे ठाकरे शिवसैनिकांना काय आदेश देणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**





हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसैनिकांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. सेनेच्या दोन्ही गटांनी या दिवसाचं औदित्य साधून विविध कार्यक्रम आयोजित केलेत. त्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा बीकेसीच्या मैदानात पार पडणार आहे. शिंदेसेनेकडून २३ जानेवारीला शिवोत्सव साजरा करण्यात येणार आहे तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्याकडूनही शिवसैनिक मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे.

२०२५ मध्ये उद्धव ठाकरे पहिल्यांदा शिवसैनिकांना संबोधित करणार आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील पराभव आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता उद्धव ठाकरे शिवसैनिकांना काय आदेश देणार याची उत्सुकता सगळ्यांनाच आहे. मुंबईत महापालिका निवडणूक आहे. त्यात राज्यातील शिवसैनिकांचा मेळावा अंधेरी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडिअमवर घेण्यात येणार आहे. संध्याकाळी ६ वाजता एकीकडे एकनाथ शिंदेंच्या सेनेचा शिवोत्सव साजरा होणार तर दुसरीकडे अंधेरी पश्चिमेत उद्धव ठाकरे शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत.

## मुंबईत 'पुष्पा'ला अटक! लाल चंदनाची चक्क रेल्वेतून फिल्मीस्टाइल तस्करी, ९७ किलो चंदन जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**



पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल स्थानकात रेल्वे पोलिसांच्या दक्षता पथकानं लाल चंदनाची तस्करी करणाऱ्या रियल लाइफ 'पुष्पा'ला अटक केली आहे. रेल्वेतून लाल चंदनाची तस्करी केली जात असल्याची टीप रेल्वे पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत मुंबई सेंट्रल स्थानकात आरोपीला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून तब्बल ९३ किलो लाल चंदन जप्त करण्यात आलं आहे.

आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून पुढील चौकशी केली जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात हे लाल चंदन आरोपीनं आणलं कुठून? ते कुणाला विकलं जाणार होतं? याबद्दलची माहिती पोलीस घेत आहेत. यामागे मोठी टोळी असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यानुसाच तपासाला सुरुवात करण्यात आली आहे. आरोपी रेल्वेच्या मालडब्ब्यातून लाल चंदनाचे छोटे छोटे तुकडे करून घेऊन प्रवास करत होता. पोलिसांनी तपासणी केली असता आरोपी रंगेहात हाती लागला. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या चंदनाचं वजन केलं असता ते ९३ किलो इतकं भरलं आहे. याची किंमत लाखो रुपयांच्या घरात आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मनसे प्रमुख राज ठाकरे पुन्हा मैदानात उद्यापासून तीन दिवस नाशकात मुक्काम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ नाशिक**

विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच मनसेचे प्रमुख राज ठाकरे उद्या (दि. २३) पासून पुन्हा एकदा मैदानात उतरत असून नाशिक येथे तीन दिवस मुक्कामी राहणार आहेत. या दौऱ्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

दौऱ्याचा तपशील अद्याप प्राप्त झाला नसला तरी ते पक्षाच्या विविध पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधणार आहे. या शिवाय आगामी महापालिका निवडणुकीच्या संदर्भात कार्यकर्त्यांना सूचना देखील करणार असल्याचे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

नाशिक हा एकेकाळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा बालेकिल्ला होता. अंतर्गत गटबाजीमुळे कार्यकर्त्यांमध्ये पसरलेली नाराजी व आगामी मनपासह, जिल्हा परिषद व इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाला ऊर्जा देण्यासाठी राज ठाकरे मैदानात उतरणार आहे. २०१२ च्या महापालिका निवडणुकीत नाशिककरांनी तब्बल ४० नगरसेवक निवडून दिले होते.

त्यामुळे २०१२ ते २०१७ या काळात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा महापौर होता. राज ठाकरे यांच्या पुढाकाराने बोटॅनिकल गार्डन, बाळासाहेब ठाकरे शस्त्र संग्रहालय, ट्राफिक चिल्ड्रन पार्क, गोदा पार्क, रिंग रोड आदी महत्वाचे प्रकल्प मार्गी लागले होते. शहराचे सुशोभीकरणावर त्यांनी विशेष लक्ष देऊन उड्डाणपुलाच्या खाली देखील सुशोभीकरण करून घेतले. याच विकास कामांच्या जोरावर २०१७ ची महापालिका निवडणूक आपण पुन्हा जिंकू असे वाटत असताना पक्षातील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली. याच काळात पक्षातील अनेक मोठे नेते पक्षाला रामराम ठोकून बाहेर पडले. त्यामुळे राज ठाकरे अंतर्गत गटबाजी संपवणार का याकडे मनसैनिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## खंडणी प्रकरणातला आरोपी वाल्मिक कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी, बीड न्यायालयाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२बीड**



बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांनी ९ डिसेंबरला निर्घृण पद्धतीने हत्या करण्यात आली. हे हत्या प्रकरण खंडणीशी संबंधित आहे. खंडणी प्रकरणी अटकेत असलेला आरोपी आणि मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आरोपी वाल्मिक कराड याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वीच वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यातही न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा संशयित मास्टरमाईंड वाल्मिक कराड आहे. वाल्मिक कराडला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बीड कोर्टासमोर हजर करण्यात आलं त्यानंतर न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पीटीआयने हे वृत्त दिलं आहे.

संतोष देशमुख हत्याप्रकरण आणि खंडणी प्रकरणाचा प्राथमिक तपास पूर्ण झाल्याची माहिती सीआयडीने न्यायालयात दिली. त्यानंतर न्यायालयाने वाल्मिक कराड याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. वाल्मिक कराडला बुधवारी (२२ जानेवारी) व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बीड न्यायालयात हजर करण्यात आले होते. वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्याप्रकरणी आज न्यायालयात सुनावणी झाली. याप्रकरणात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याने वाल्मिक कराड याच्याकडून जामिनासाठी प्रयत्न होणार का, पहावं लागणार आहे. मात्र, मकोका लागल्याने वाल्मिक कराडला तूर्तास जामीन मिळणे अवघड असल्याचं मानलं जातं आहे.

**वाल्मिक कराडचं सीसीटीव्ही फुटेजही व्हायरल**

वाल्मिक कराड, सुदर्शन घुले आणि विष्णू चाटे एकत्र असल्याचं एक सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झालं आहे. हे फुटेज २९ नोव्हेंबरचं आहे असंही सांगितलं जातं आहे. याबाबत जितेंद्र आव्हाड, अंजली दमानिया यांच्याही प्रतिक्रिया आल्या आहेत. वाल्मिक कराडने अवादा कंपनीकडे खंडणी मागितली, त्या दिवशीचं सीसीटीव्ही फुटेज असल्याचा दावा केला जातो आहे. केज शहरातील विष्णू चाटेच्या कार्यालयात वाल्मिक कराड २९ नोव्हेंबरला आला होता. त्यावेळी त्याच्यासह सुदर्शन घुले आणि विष्णू चाटे हे सुद्धा या फुटेजमध्ये पाहायला मिळत आहेत. विशेष म्हणजे केज पोलीस स्टेशनचे निलंबित पीएसआय राजेश पाटील हेसुद्धा यावेळी वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुलेसोबत दिसत आहेत. वाल्मिक कराडविरोधात हा महत्त्वाचा पुरावा असल्याचं बोललं जातं आहे.

संपादकीय ......

# महाराष्ट्राची 'लालपरी' खरंच स्मार्ट होणार?

हल्लीच्या प्रचंड धावपळीच्या आणि अत्यंत गतिमान काळात असे दुर्मीळ मध्यमवर्गीय अथवा निम्नमध्यम वर्गीय कुटुंब असावे की ज्यांच्याकडे दुचाकी अथवा चारचाकी गाडी घरासमोर नाही. काही वर्षांपूर्वी चारचाकी गाडी ही चैनीची वस्तू म्हणून मध्यमवर्गीय त्याकडे पाहायचे; परंतु काळाच्या ओघात आणि गतीच्या स्पर्धेत परंपरागत सर्व समज मागे पडले आणि कुटुंबामध्ये चारचाकी असणे हे गरजेचे लक्षण बनले आणि ज्या कुटुंबाकडे चारचाकी घेण्याची आर्थिक क्षमता नाही त्यांच्याकडे किमान दुचाकी तरी असतेच असते. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय समाजाच्या जीवनशैलीमध्ये जो काही एक आमुलाग्र बदल झाला त्यामध्ये चारचाकी आणि दुचाकी वाहनांची निर्माण झालेली अथवा करण्यात आलेली गरज हा एक मोठा बदल म्हणावा लागेल. मात्र असे असले तरी देखील आजही गावोगावी खेडोपाडी अगदी दुरगामी वाड्या, वस्त्यांवर पाड्यांवर केवळ पाच ते दहा रुपयाच्या नाममात्र शुल्कामध्ये हमखास नेऊन सोडणारी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची बस सेवा ही तळागाळातील गोरगरीब जनतेसाठी आजही त्याच्या दैनंदिन गरजा भागवण्यामध्ये आणि दैनंदिन व्यवहारामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

ज्याप्रमाणे मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा ही रक्तवाहिनी म्हणून ओळखली जाते त्याचप्रमाणे एसटी बस ही ग्रामीण महाराष्ट्राची आणि त्यातही अत्यंत गोरगरीब जनतेची खऱ्या अर्थाने रक्तवाहिनी म्हणूनच काम करत आहे. अर्थात कोणत्याही देशाची अथवा राज्याची सार्वजनिक वाहतूक यंत्रणा ही आर्थिकदृष्ट्या फायद्यामध्ये कधीच नसते त्यामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे गेली वर्षांनुवर्षे तोट्याची कोटींच्या कोटी उड्डाणे घेत आहे. सरकार येतात आणि जातातही. मात्र गोरगरिबांना अत्यंत अल्पशा भाड्यामध्ये त्यांच्या घराजवळ हक्काने नेऊन सोडणारी एसटी ही मात्र गेली वर्षांनुवर्ष दारिद्र्यात आणि तोट्याच्या दुष्टचक्रात अडकून पडलेली आहे. त्यात प्रामुख्याने सत्तेवर असलेल्या राजकीय पक्षांची एसटी महामंडळाकडे पाहण्याची दृष्टी, खासगी वाहनांचा वाढलेला अतिरेकी आणि बेसुमार वापर, अवैध प्रवासी वाहतुकीला मिळणारे पाठबळ आणि त्याचबरोबर उपद्रवी घटकांचा एसटीचे लचके तोडण्याचा सातत्याने सुरू असलेला प्रयत्न हे जे लक्षात घेतले तर केवळ आणि केवळ प्रामाणिक आणि कष्टकरी राज्य परिवहन मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या पाठबळावरच महाराष्ट्राची ही जीवन वाहिनी एवढ्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील स्वतःचे अस्तित्व राखून आहे असेच म्हणावे लागेल.

मग पगाराची कोणतीही हमी ना भविष्य निर्वाह निधीची कोणतीही शाश्वती मात्र असे असले तरी देखील ज्या निष्ठेने आणि ज्या तळमळीने एसटी महामंडळाचे कर्मचारी केवळ सर्वसामान्य गोरगरीब प्रवाशांच्या करिता हा उपक्रम जिवंत ठेवत आहेत हे खरोखरच अत्यंत धाडसाचे आणि कौतुकास्पद म्हणावे लागेल. मध्यंतरी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने महाराष्ट्रातील महिलांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवेत ५० टक्के बस भाड्यामध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला. आणि त्याचा एक मोठा परिणाम जो परिवहन महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर दिसून आला. तो म्हणजे महामंडळाच्या उत्पन्नात या निर्णयामुळे घसघशीत वाढ झाली. यामुळे कर्मचाऱ्यांना किमान महिनाभराचे वेतन तरी दोन-चार दिवस मागेपुढे का होईना परंतु मिळू लागले. अन्यथा दोन-दोन, चार-चार महिने एसटी कर्मचाऱ्यांना वेतन मिळतानाही मारामारी होती आणि त्यासाठी देखील अखेरीस महामंडळाला राज्य सरकार पुढे हात पसरावे लागत होते. अर्थात आता राज्यामध्ये भाजप शिवसेना अजित पवार यांचे राष्ट्रवादी अशा भरभक्कम महायुतीचे बाहुबली बहुमताचे सक्षम महायुती सरकार सत्तेवर आहे आणि परिवहन मंत्रालयाची जबाबदारी तरुण आणि कार्यक्षमतेची चुणूक दाखवणारे नेते म्हणून समजले जाणाऱ्या प्रताप सरनाईक यांच्यासारख्या उमद्या तडफदार मंत्र्याकडे परिवहन मंत्रालयाची जबाबदारी आहे. परिवहन खात्याचा कारभार हाती घेतल्यानंतर तातडीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठाणे मीरा-भाईंदर या त्यांच्या स्वतःच्या कार्यक्षेत्रापासूनच कामाचा श्री गणेशा सुरू केला. ठाण्यातील एसटी बस डेपोंना तातडीने भेटी देत त्यांनी तेथील यंत्रणांना बेशिस्तपणा न खपवून घेण्याबाबत चांगलीच समज दिली. आणि त्याचबरोबर आर्थिक तोट्याच्या दुष्टचक्रात अडकून पडलेल्या एसटी महामंडळाला पुन्हा उभारी आणण्यासाठी तसेच एसटी महामंडळाकरिता नवनवीन आर्थिक स्त्रोत कसे विकसित करता येतील याकरता प्रताप सरनाईक यांनी जोमाने काम सुरू केले.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे सर्वात मोठी जमेची बाजू जर कोणती असेल तर ते म्हणजे महामंडळाचे प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अथवा मोठ्या शहरांमध्ये देखील मोक्याच्या ठिकाणी असलेले स्वतःच्या जागेतील एसटीचे डेपो आणि तेथील जागा आहे. या आधीच्या परिवहन मंत्र्यांनी देखील एसटीच्या डेपोंचा बीओटी तत्त्वावर खासगी करण्याच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रयत्न केला तथापि त्याला होणारा विरोध आणि विरोधातून होणारी शेवटी कोर्टबाजी यात एसटी डेपोंचा विकास हा शेवटी अडकून पडला. परिवहन मंत्री झाल्यानंतर प्रताप सरनाईक यांनी सर्वप्रथम मीरा-भाईंदर येथील एसटी महामंडळाची जागा मीरा-भाईंदर महापालिकेला विकसित करण्यासाठी दिली आणि त्यामुळे आता मीरा-भाईंदरमधील एसटीच्या या जागेचा चेहरा मोहरा पूर्णतः बदलणार आहे. त्याचबरोबर सरनाईक यांनी आणखी एक नवीन निर्णय घेतला आहे तो म्हणजे एसटी डेपोमध्ये एसटीचे स्वतःचे डिझेलचे पंप आहेत हे ऑइल कंपन्यांना चालवण्यास देऊन त्याद्वारे एसटी महामंडळाला वाढीव उत्पन्नाचा एक नवीन स्त्रोत निर्माण करता येऊ शकेल असे त्यांचे प्रयत्न आहेत. त्याचबरोबर भाडेतत्त्वावरील बसेस बंद करण्याचा निर्णय घेऊन आगामी काळात ५०० नवीन बस गाड्या घेण्याचा मनोदयही त्यांनी व्यक्त केला आहे. एसटी महामंडळ तोट्यातून जर फायद्यात येणार असेल, तर निश्चितच अशा धाडसी निर्णयांचे स्वागतच केले पाहिजे मात्र त्याचबरोबर हे धाडसी निर्णय अंगावर येणार नाहीत याची देखील काळजी परिवहन मंत्र्यांनी तसेच राज्य सरकारने घेण्याची गरज आहे.

उत्पन्नाचे वाढीव स्त्रोत शोधताना एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे ती म्हणजे महाराष्ट्रात जी मोठ्या प्रमाणावर खासगी अवैध प्रवासी वाहतूक फोफावलेली आहे तिला जर प्रतिबंध करायचा असेल, तर केवळ कायदे अथवा नियमांचा धाकदपटशा दाखवून अवैध प्रवासी वाहतूक बंद होणार नाही, तर त्या पलीकडे जाऊन यामध्ये अधिक काम करण्याची गरज आहे.

# नैसर्गिक शेतीवर भर

## जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती सभा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती,** केंद्र शासनाने राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन या महत्त्वाकांक्षी योजनेस मंजूरी दिलेली आहे. या मिशनची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागामार्फत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. मिशनची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती व तालुकास्तरावर तालुका कृषि अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने जिल्ह्यासाठी एकूण ३ हजार ५०० हेक्टर क्षेत्रावर ७० शेतकरी गट स्थापन करण्याचे लक्षांक प्राप्त आहे.

या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची नुकतीच आयोजित करण्यात आली. या सभेमध्ये समितीमधील सदस्य यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत विविध घटकांच्या आधारे ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील मुख्य नद्यांच्या काठावरील गावे या घटकामधून चांदुर बाजार व



तिवसा मधील एकूण २० गावे (ग्रामपंचायत संख्या १८), जास्त खते वापर असलेली गावे या घटकामधून मोर्शी व वरुड मधील एकूण १७ गावे (ग्रामपंचायत संख्या १४), कमी खते वापर असलेली गावे या घटकामधून नांदगाव खंडेश्वर व चिखलदरा एकूण ३४ (ग्रामपंचायत संख्या १९) गावे तसेच दुर्गम भागातील समाविष्ट गावे या घटकामधून धारणी मधील एकूण ११ गावे (ग्रामपंचायत संख्या५) याप्रमाणे संपूर्ण जिल्हयामधील एकूण ५६ ग्रामपंचातीमधील ८२ गावांची निवड करण्यात आलेली आहे.

लक्षांकाप्रमाणे एकूण ७० शेतकरी समूहांची निवड करण्यासाठी सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातून इच्छुक १२५ शेतकऱ्यांना प्रती शेतकरी एक एकर क्षेत्रासाठी सहभागी करून घेण्यात येणार असून प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येकी दोन कृषी सखींची निवड करण्यात येणार आहे. नैसर्गिक पद्धतीवर आधारित स्थानिक पशुधन शेती पद्धती लोकप्रिय करणे, जमिनीचा पोत सुधारणे, बाहेरुन निविष्ठा खरेदी कमी करून शेतावरच आवश्यक निविष्ठा निर्मिती करणे व त्याचा वापर वाढविणे, शेतमाल उत्पादनाचा खर्च कमी करणे आणि सहभागी शेतकऱ्यांच्या शेतीचे नैसगिक शेती प्रमाणिकरण करणे ही अभियानाची उदिष्टे आहेत. या अभियानात सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी तालुका सनियंत्रण समिती अध्यक्ष तथा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प संचालक यांनी केले आहे.

# दररोज आहारात ह्या पालेभाज्या ठेवाल तर असा होईल आरोग्यासाठी फायदा; पाहूया सविस्तर




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती-** मेथी, कोथिंबीर, पालक, शेपू, चुका, चाकवत, मुळा, राजगिरा, लेट्युस ही कमी कालावधीत येणारी भाजीपाला पिके आहेत. फक्त पुरवठा करणे हा या भाजीपाला पिकांच्या लागवडीचा उद्देश नसून त्यासोबत आहारातील त्यांच्या नियमित समावेशाने होणारे फायदेदेखील महत्वाचे आहेत.

भाजीपाला पिके आणि आहारातील महत्व

**१) मेथी-** मेथी त्वचेची लवचिकता वाढवते आणि वृध्दत्वाची चिन्हे कमी करते. मेथी पानांमधील फॅटी ॲसिडस आणि प्रथिन केसांना बळकट करते. केसांच्या वाढीस प्रोत्साहन देते. मेथीची भाजी ही वातनाशक असून खोकला व तापावर उत्तम औषध आहे. मेथीचे दररोजच्या आहारात सेवन केल्याने कमरेचे दुखणे दूर होते. शारीरिक शक्ती वाढते.

**२) कोथिंबीर-** कोथिंबीरीची पाने जठराची जळजळ कमी करून तेथील अंतः स्राव वाढवतात. कोथिंबीरने ताप कमी होतो, पित्त शमते, दृष्टिदोष कमी होतो. कोथिंबीर शीत गुणाची असुनही पाचक व रुची टिकवणारी आहे.

**३) पालक-** पालकाच्या पानांमध्ये कॅल्शियम असते. मज्जासंस्था, हृदय आणि स्नायुंसाठी कॅल्शियम गरजेचे आहे. पालकामध्ये 'अ' जीवनसत्व असते दृष्टी कमजोर झाली असेल तर आहारात पालकाचा समावेश करा.

**४) शेपू-** शेपुची भाजी रेचक, पचायला हलकी आहे. शेपुच्या भाजीमुळे पचनक्रियेचा




मार्गदेखील मोकळा व स्वच्छ राहण्यास मदत होते. अपचनामुळे छातीत होणारी जळजळ कमी करण्यासाठी शेपू अतिशय फायदेशीर आहे.

**५) आंबट चुका-** पचायला कठीण असणाऱ्या पदार्थांबरोबर चुक्याची पाने वापरावीत, यामुळे अन्न पचनास मदत होते यात विपुल प्रमाणात कॅल्शियम, लोह असते.

**६) चाकवत-** चाकवत रुचकर, रक्तशोधक, दर्दनाशक, त्रिदोषशामक, शीतवीर्य, बलवर्धक आहे. चाकवत डोळे, लघवी व पोटासंबंधीच्या तक्रारीसाठी विशेष लाभदायक आहे.

**७) मुळा-** मुळा मूळव्याध, कफ, वायु, आतड्यांच्या रोग्यांसाठी उपयुक्त आहे. मुळ्याच्या पानांची भाजी तसेच रस काढून पितात. पचनशक्ती सुधारते, आतड्यातील जंतुंचा नाश होतो. मुत्रविकारामध्ये फार लाभदायी आहे. यकृत तसेच हृदयासाठी उपयुक्त. बद्धकोष्टता नाहीशी होते.

**८) राजगिरा-** राजगिरा पालेभाजी रक्तशुध्दीकरिता उपयुक्त आहे. गंडमाळा क्षय, लघवीची जळजळ या विकारांत पालेभाजी किंवा त्या पानांचा वाटून लेप करावा. शरीरस्वास्थाकरिता लागणारी द्रव्ये राजगिरा पाने व बिया या दोन्ही मध्येही आहेत.

**९) लेट्युस-** लेट्युस रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी उपयुक्त आहे. लेट्युसच्या पानांचे सेवन निद्रानाशाची समस्या कमी करते. लेट्युसचे सेवन केल्यास शरिरातील पाण्याची कमतरता भरून निघते. लेट्युस वजन कमी करण्यात अधिक मदत करते. लेट्युस खाल्ल्याने स्नायु आणि चयापचय मजबूत होते.







## स्वयंपाकघरातील काही भांडी आपल्या आरोग्यासाठी धोकादायक, किचनमधील भांड्यांत लपलंय कॅन्सरचं कारण

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्या दैनंदिन जीवनात स्वयंपाकघरातील भांडी खूप महत्त्वाची असतात. परंतु अलीकडील एका अभ्यासात, तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की, स्वयंपाकघरातील काही भांडी आपल्या आरोग्यासाठी धोकादायक असू शकतात, विशेषतः कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचं कारण ठरू शकतात. या अभ्यासानुसार, स्वयंपाकघरातील भांड्यांमध्ये असलेलं मायक्रो प्लास्टिक आपल्या आरोग्यासाठी मोठा धोका निर्माण करू शकतात.



डेली मेलमधील एका वृत्तानुसार, तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, अनेक भांड्यांमध्ये प्लास्टिकचे कण असतात जे उष्णतेच्या संपर्कात आल्यानंतर आपल्या अन्नात विरघळू शकतात. हे मायक्रो प्लास्टिकचे कण शरीरात जमा होऊ लागतात, ज्यामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. शरीरात मायक्रोप्लास्टिक जमा झाल्यामुळे कॅन्सर, हार्मोनल असंतुलन आणि इतर गंभीर आजार होऊ शकतात, असंही या अभ्यासातून समोर आलं आहे.

तज्ज्ञ काय म्हणतात?

तज्ज्ञांचं म्हणणं आहे की स्वयंपाकघरात वापरली जाणारी काही भांडी जसं की प्लास्टिकची भांडी, काही नॉन-स्टिक पॅन आणि प्लास्टिक रॅप्समध्ये मायक्रोप्लास्टिक्स असू शकतात. ही भांडी उष्णतेच्या संपर्कात येताच हे कण बाहेर येतात, जे नंतर आपल्या अन्नात मिसळतात. त्याचे दीर्घकालीन परिणाम शरीरात विविध प्रकारच्या आजारांच्या स्वरूपात दिसून येऊ शकतात.

यावर उपाय काय?

अशा भांड्यांचा वापर ताबडतोब थांबवावा असं शास्त्रज्ञांचं मत आहे. लोकांनी स्टेनलेस स्टील, काच आणि बांबूपासून बनवलेली भांडी वापरावीत, जी आरोग्यासाठी सुरक्षित मानली जातात. प्लास्टिकची भांडी आणि नॉन-स्टिक पॅनचा वापर कमीत कमी करा, कारण त्यातून बाहेर पडणारे मायक्रो प्लास्टिक कण आपल्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम करू शकतात.

# कर्ज एकरकमी फेडल्यास ५० टक्के व्याज माफ

## इमाव विकास महामंडळाची परतावा योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अकोला-** राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या थकित कर्ज प्रकरणात संपूर्ण रकमेचा एकाचवेळी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांना थकित व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्यात येत आहे.

थकबाकीदारांना या एकरकमी परतावा योजनेचा (ओटीएस) दि. ३१ मार्चपर्यंत लाभ घेता येईल. त्यानुसार एकरकमी कर्ज फेडून थकबाकीदार लाभार्थींनी योजनेचा फायदा घ्यावा व कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. हे कार्यालय तापडिया नगरातील गल्ली क्र. तीनमध्ये आहे. संपर्क दूरध्वनी (०७२४) २४१०२२१ असा आहे.

# पहिले राज्यस्तरीय बाल साहित्य संमेलन २३ व २४ ला

## प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रम शाळेत मकरंद अनासपुरे करणार उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती -** फासे पारधी समाजातील अनाथ, भीक मागणाऱ्या मुलामुलींना शिक्षण देत असलेल्या प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रम शाळा मंगरूळ चव्हाळा येथे दोन दिवसीय २३ व २४ जानेवारी रोजी पहिले राज्यस्तरीय बालसाहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन सिने अभिनेता तथा नाम फाउंडेशनच्या संस्थापक मकरंद अनासपूरे करणार आहेत तर संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कवी तथा लेखक अनंत राऊत राहणार असल्याची माहिती प्रश्नचिन्ह आदिवासी आश्रम शाळेचे अध्यक्ष मतीन भोसले यांनी मंगळवारी पत्र परिषदेत दिली.

संमेलनाला विशेष अतिथी म्हणून अन्न व औषधी प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, आमदार राजू तोडसाम, ज्येष्ठ साहित्यिक दगडूकाका लोमटे, लेखक अरविंद जगताप, युवा दिग्दर्शक मल्हार पाटेकर, सामाजिक कार्यकर्ते ममता सपकाळ, डॉक्टर अरुंधती भालेराव उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रताप अडसड, आमदार रवी राणा, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, आदिवासी अप्पर आयुक्त जितेंद्र चौधरी, सहाय्यक जिल्हाधिकारी प्रियवंदा माडदळकर, चांदुर रेल्वेच्या उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, तहसीलदार परसराम भोसले, मिशन आयएस अॅकॅडमी चे नरेशचंद्र काठोळे, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे मतीन भोसले यांनी सांगितले.




पहिल्या राज्यस्तरीय बालसाहित्य संमेलनामध्ये राज्यभरातील शाळेतील विद्यार्थी त्यांच्या स्वरचित कथा, कविता व इतर साहित्य कलाकृती सादर करणार आहेत. बहुसंख्येने विद्यार्थी साहित्य संमेलनात सहभागी होणार आहेत.

संमेलनाच्या उद्घाटकीय कार्यक्रमात सकाळी दिंडी, प्रभात फेरी काढण्यात येणार आहे. साहित्य प्रेमींनी पहिल्या राज्यस्तरीय बालसाहित्य संमेलना बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन मतीन भोसले यांनी केले आहे. पत्रपरिषदेला नामसिंग पवार, नूरदास भोसले, संघर्ष भोसले उपस्थित होते.

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २२ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण

# सायन्सकोर मैदानात २४ ते २८ जानेवारी मिनी सरस प्रदर्शनी

## चिकन, मटन, मांडे, ज्वारी, बाजरी भाकरी, रोडगे, पिठल, भाकरी, बासुंदी, पुरणपोळी, थालीपीठ राहणार आकर्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती, –** ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे सबलीकरण करणे व उपजीविका आधारित उपक्रम राबविणे यासाठी उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून स्वयं सहाय्यता समूहाने उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी दि. २४ ते २८ जानेवारी २०२५ दरम्यान विक्री प्रदर्शनीचे आयोजन मुख्य बस स्थानक समोर, सायन्स स्कोर मैदान, अमरावती येथे आयोजित करण्यात येत आहे. या प्रदर्शनीमध्ये अमरावती जिल्ह्यातील ६० स्वयं सहाय्यता समूह तसेच इतर जिल्ह्यातील १० स्वयं सहाय्यता समूह असे एकूण ७५ समूहाचे स्टॉल्स लावण्यात येत आहेत. या प्रदर्शनीमध्ये ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहाद्वारे उत्पादित विविध खाद्य पदार्थ, तसेच इतर आकर्षक वस्तू नागरिकांना खरेदीसाठी ठेवण्यात येणार आहे. या मिनी सरस प्रदर्शनामध्ये ७ स्टॉल्स शाकाहारी ज्यामध्ये (रोडगे, पिठल, भाकरी, बासुंदी, मांडे, पुरणपोळी, थालीपीठ ) यांचा समवेश आहे तर ८ स्टॉल्स मासाहारी (चिकन, मटन, मांडे, ज्वारी, बाजरी भाकरी) या विदर्भातील ग्रामीण भागातील मुख्य आकर्षण असलेल्या खाद्यपदार्थांचा समावेश आहे. या प्रदर्शनीमध्ये नागरिकांना मिक्स मिलेट्स कडधान्य, सर्व प्रकारचे मसाले, डिंक लाडू, पंचरत्न लाडू, मोह लाडू, डिंक लाडू, ज्वारी, बाजरी, सोया प्रोडक्ट्स, सोया इडली, ढोकळा, मोरिंगा पावडर, हळद पावडर, सर्व प्रकारची लोणची, खारोडी, मुगवडी, जवस चटणी, खंडू चक्का तेल, शुद्ध देशी गाईचे तूप, गाईचे शेणापासून बनविलेल्या धूपबत्ती, मकरसंक्रांतनिमित्त हलव्याचे दागिने, तीळ–गुडिया व बांबू पासून विविध आकर्षक वस्तू विक्रीसाठी या प्रदर्शनामध्ये मिळणार आहे. स्वयंसहाय्यता समूहातील महिलांना प्रोत्साहान देण्यासाठी नागरिकांनी या प्रदर्शनीला भेटदेण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी केले आहे.



# थकबाकी असलेल्या भागातील पाणीपुरवठा होणार बंद

## मजीप्राने दिला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** पाणी पट्टीपोटी ग्राहकांकडे साधारणत ४५० कोटी थकबाकी असल्याने वसूलीकरीता म.जी.प्रा.ने अनेकवेळा आवाहन करूनही प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदार ग्राहकांच्या नळजोडण्या खंडीत करणे, ज्याभागात ९० थकबाकीदार ग्राहक आहेत, त्याभागातील संपूर्ण पाणी पुरवठा बंद करण्याचा इशारा मजीप्राच्या वतीने देण्यात आला आहे.



### या भागातील पाणी बंद होणार

विशेषतः वडाळी, वडरपूरा, हमालपूरा, शेगाव, रहाटगांव, सिद्धार्थ नगर, महाजनपूरा, पठाणपूरा, छाया नगर, अन्सारनगर, मसानगंज, यास्मीन नगर, गुलीस्ता नगर, रहेमत नगर, ताज नगर तसेच बडनेरा शहरातील माताफैल, स्विपरकॉलनी, पाचबंगला, अलमासनगर, चमननगर, मोतीनगर व संलग्न भागांचा थकबाकीदारांमध्ये समावेश आहे.अनेक वेळा ध्वनीक्षेपकाद्वारे आवाहन करूनही अथवा नोटीस बजावूनही जे ग्राहक पाणी पट्टी भरण्यास टाळाटाळकरतात, अशा ग्राहकांचा अथवा संबधीत भागाचा संपूर्ण पाणी पुरवठा नाईलाजाने बंद करण्याचा अप्रिय निर्णयम.जी. प्राला घ्यावा लागत आहे. **– संजय लेवरकर,** (उपविभागीय अभियंता, म.जी.प्रा.)

सद्यस्थितीत शहरात एकूण १०२४१६ नळजोडणीधारक असून फक्त ३०% ग्राहक नियमीत पाणी पट्टीचा भरणा करतात. परिणामी योजनेवरील खर्च व पाणी पट्टी द्वारे मिळणारे उत्पन्न यातीत तफावत वाढून सद्यस्थितीत योजनेला रू. ८.०८ कोटी रुपयाचे नुकसान सहन करावा लागत आहे. विजेचे देयक निधी अभावी थकीत राहल्यास म.रा.वि.वि. कंपनी रू.१ लाख म.जी.प्रा.स दंड ठोठावते. योजना घाटयात असल्याने देखभाल दुरूस्तीच्या कामाचे कंत्राटदारांना देय असलेले पैसे म.जी.प्रा. ला देणे अशक्य झाले आहे. तरीही कंत्राटदार व्याजाने पैसे आणून योजनेद्वारे पाणी पुरवठा अबाधीत राहण्यासाठी सहकार्य करीत आहे. योजना तोटयात असल्याने शहरातील पाणी पूरवठ्यासंबंधाने सूधारणात्मक कामे करणे म.जी.प्रा.ला अशक्य झाले आहे. म.जी.प्रा.लादरमहा साधारणतः रू. ३ कोटी चाखर्च करावा लागतो.

अवैध नळजोडणी धारकांनी दंडासह नळजोडणी वैध करून न घेतल्यास, त्यांचेवर फौजदारी कार्यवाही आरंभिलेली आहे. अमरावती–बडनेरा शहराला नियमीत शुद्ध पाण्याचा पुरवठा होणेकरीता ग्राहकांनी पाणी पट्टीचा भरणा करूनम .जी. प्रासहकार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा कोणत्याही क्षणी शहराचा पाणीपुरवठा बंद होऊ शकतो, असा इशारा देण्यात आलाआहे. अमृत– २ योजनें तर्गत रू.९८५.४९ कोटी च्या कामास शासनाने नुकतीच मंजूरी दिली असून त्यापैकी ३८६.६० कोटी म.जी.प्रा.स उभारावयाचे आहे. या रक्कमेची पूर्तता पाणी पट्टी वसूलीतून करण्याबाबतची हमी म.जी.प्रा.ने घेतलेली आहे. अमृत – २ योजनेची कामे स्वहिस्सा अभावी राज्य व केंद्र शासनाचा हिस्सा प्राप्त न झाल्यास रखडण्याची शक्यता आहे.

# बडनेरा येथे शिवसेना नेते अरविंद सावंत यांच्या पुतळ्याचे दहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२बडनेरा**–शिवसेना (ठाकरे) नेते खा. अरविंद सावंत जेव्हापासून अमरावती जिल्ह्याचे संपर्क प्रमुख झालेत तेव्हापासून शिवसेनेची अमरावती जिल्ह्यात वाताहत झाली. मागील विधानसभा निवडणूकीत शिवसेनेशी गद्दारी करणाऱ्या तसेच निष्क्रिय अशा लोकांना पदांचीखिरापत वाटून कट्टर अशा निष्ठावान शिवसैनिकांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झाला, असे सांगत मंगळवारी संध्याकाळी आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर आठवडी बाजार नवीवस्ती बडनेरा येथे बडनेरा शहर शिवसेनेच्या वतीने खा. अरविंद सावंत यांचा पुतळा जाळून जाहीर निषेध नोंदवण्यात आला. यावेळीकुचीन कैथवास, उमेश वाठ, प्रकाश बांते, रवी अंबाडकर, राजू अक्कलवार, शेखर घिमे, संदीप इंगोले, निलेश सावळे, संजय खांडेकर, स्वप्नील दारोकार, सागर पंदे, सुरेश देव्हारे, आनंद जोशी, सनी कैथवास, आकाश कैथवास, रवी कैथवास, कैलाश कैथवास, सतीश कुरवाळे, शैलेश देशमुख, रवी तरारे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# पोलीस पाटील बापू जामुनकर बडतर्फ

## रेहट्याखेडा येथील महिलेची धिंड काढल्याचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मेळघाट–** चिखलदा तालुक्यातील रेहट्याखेडा येथे काळमी नंदराम शेलूकर (वय ७७) ही जादुटोणा करते या कारणावरुन तिची धिड काढल्याप्रकरणी पोलीसांच्या अहवालानुसार सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, धारणी यांनी महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम १९६७च्या कलम ९ (च) अन्वये पोलीस पाटील बापू झापू जामुनकर (रा. रेहट्याखेडा) यांना पोलीस पाटील या पदावरून बडतर्फ केले आहे.



रेहट्याखेडा येथे ही घटना ३० डिसेंबरला पहाटे घडली होती. घटनेनंतर काळमीचा मुलगा व सुनेने ७ जानेवारीला चिखलदरा ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी शामू राजकुमार शेलुकर, रा. रेहटयाखेडा, यांच्या तक्रारीवरून कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२) (३), ३ (५) भारतीय न्यायसंहिता प्रमाणे गुन्हे दाखल केले. परंतु न्याय न मिळाल्यामुळे काळमीने मुलगा व सुनेसोबत १७जानेवारीला अमरावतीला येऊन जिल्हाधिकाऱ्यासह पोलीस अधीक्षकांची भेट घेत घडलेला सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर संबंधीत प्रकरणात १८ जानेवारीला कलम ११८ (२), १९१ (२) १२७ (२) भारतीय न्याय संहिता सहकलम ३ (२) महाराष्ट्र जादूटोणा प्रतीबंधक अधिनियम २०१३ समाविष्ट करुन १९ जानेवारीला पोलीस पाटील बापू जामुनकरसह पाचही आरोपींना अटक केली. त्यानंतर पोलीस पाटील जामुनकर यांनी सादर केलेल्या खुलाश्यात त्याच्यावरील आरोपांचे खंडन केले नाही.बापू जामुनकर याने गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडवून आणून पोलीस पाटील पदाची प्रतिष्ठा मलीन केली आहे, असा ठपका ठेवत महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम–१९६७ च्या कलम ९ (च) अन्वये, पोलीस पाटील बापु जामुनकर या दोषी ठरवत सहायक जिल्हाधिकारी तथा धारणीचे उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम–१९६७ अन्वये बापु झापु जामुनकर, पोलीस पाटील, रेहट्याखेडा, ता.चिखलदरा, जि. अमरावती याला महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील अधिनियम–१९६७ च्या कलम ९(च) अन्वये आदेशाच्या दिनांका पासून पोलीस पाटील या पदा वरून बडतर्फ केले आहे, असे आदेश काढण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेसाठी आता युनिफाईड वेब पोर्टल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)–२ ची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करण्यात येत असून घटक क्र.१ (वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधकाम BLC) अंतर्गत लाभार्थी निश्चित करण्याकरिता केंद्र शासनाकडून युनिफाईड वेब पोर्टल (https://pmaymis.gov.in/PM-YMIS232024/PmayDefault.aspx) विकसित केले आहे. या पोर्टलवर इच्छुक लाभार्थ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे.

नियमानुसार, लाभार्थी कुटूंबामधे पती, पत्नी व अविवाहित मुले, मुली यांचा समावेश राहील,

या योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करुन घेणेकरिता शहरी भागात राहणाऱ्या कुटूंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर नसावे, लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा, पात्र लाभार्थ्यांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाख राहील,

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) १.०० अंतर्गत मंजूर केलेल्या घरकुलांमधे दि.३१.१२.२०२३ नंतर कोणत्याही कारणास्तवनावाची कपात केली असल्यास सदर घरकुलांना प्र.आ.यो. (शहरी) – २ अंतर्गत मान्यता दिली जाणार नाही, सदर योजने अंतर्गत घटक क्र.१ (BLC) घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षपर्यंत घर विकण्यास / हस्तांतरित करण्यास लाभार्थ्याला परवानगी दिली जाणार नाही, योजने अंतर्गत EWS वंचित लाभार्थ्यांना शौचालय व अन्य पायाभूत सुविधांसह ३० ते ४५ चौ.मी. पर्यंत स्वमालकीचे जागेवर घरकुल बांधता येईल, केंद्र व राज्य शासन मिळून घरकुल बांधकामाकरिता अनुदान रुपये २.५० लक्ष राहील. घरकुल बांधकामाकरिता लागणारी उर्वरित रक्कम लाभार्थी हिस्सा राहील, या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून लाभार्थी प्रकल्पास (D.P.R.) मंजूरी प्राप्त झाल्यावर घरकुल बांधकामाचा नकाशा संबंधित झोन कार्यालयातून ३० दिवसांमधे मंजूर करुन कार्यारंभ आदेश वितरित करणेकरिता या



कार्यालयात जमा करावा लागणार आहे. पात्र होणाऱ्या शहरातील लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.–

# अमरावतीत ४०१ तासाचा वर्ल्ड रेकॉर्ड

## साडेपाचशे कलाकारांनी केला एकच जल्लोष

### ४०१ तास पूर्ण होताच फटाक्यांची आतषबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती –** स्थानिक शेगाव नाकास्थित अभियंता भवन येथे मंगळवारी दुपारी एक वाजता वर्ल्ड रेकॉर्ड रचल्या गेला. ४ जानेवारीपासून सुरू असलेल्या हुनर की तलाश याकार्यक्रमाने सलग ४०० एक तास आपली कला सादर करून वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केला. ४०१ तास पूर्ण होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली व सहभागी झालेल्या साडेपाचशे कलाकारांनी एकच जल्लोष केला.यावेळी अभियंता भवनात आनंदाला उधाण आले होते. अमरावती विदर्भाची सांस्कृतिक राजधानी असून या राजधानीत इतिहासात लिहिल्या जाणारी ऐतिहासिक कामगिरी करण्यात आली आहे.या कार्यक्रमाला वर्ल्ड रेकॉर्ड दिल्लीचे सीईओ पवन सोलंकी प्रमुख अतिथी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके तसेच नागपूरचे मनीष पाटील, समाजसेवक नानक नेभणानी, समाजसेवक गोविंद कासट, बिल्डर सचिन वानखडे, अभिनंदन बँकेचे सुदर्शन जैन, पुरुषोत्तम मुंदडा, दिलीपराव लोखंडे, महात्मा फुले बँकेचे संचालक राजेंद्र आंन्डे, चंद्रकांत पोपट, राजाभाऊ हाडोळे, गजू लोखंडे, अक्षय लोखंडे, प्रभाकरराव घाटोळ, स्वराध्या एंटरटेनमेंटचे संचालक दिनकर तायडे, संचालिका स्वामिनी तायडे व स्वराध्या इंटरटेनमेंटची संपूर्ण टीम यावेळी उपस्थित होती. मागील १८ दिवसापासून रात्रंदिवस न थांबता निरंतर हा कार्यक्रम सुरू होता. यावेळी भारतातील अनेक कलावंतांनी संगीताच्या माध्यमातून आपली कला सादर करून या ठिकाणी विविध गीते गाऊन जगातील श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.स्वराध्या एंटरटेनमेंट च्या संचालिका स्वामिनी तायडे यांनी प्रास्ताविक, संचालन ईशांत राजगुरे, आभार दीप्ती सहारे यांनी केले.

### जे अमरावती ने केले ते भारतात कुणीच केले नाही

४०१ तासाचा वर्ल्ड रेकॉर्ड करणे फार कठीण होते, ते आज अमरावतीकारांनी करून दाखविले. या आधी वरुड, नागपूर, गुजरात, येथे वर्ल्ड रेकॉर्ड झाले परंतु इतिहासात पहिल्यांदा ४०१ तासाचे वर्ल्ड रेकॉर्ड अमरावतीने पूर्ण केले एवढे मोठे रेकॉर्ड आतापर्यंत भारतातही कुणी केलेले नाही.
**– पवन सोलंकी,** सीईओ वर्ल्ड रेकॉर्ड दिल्ली.



# ‘उद्धव ठाकरे आणि शरद पवारांचा पक्ष लवकरच भाजपा सोबत दिसतील – बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२मुंबई–** विधान सभेच्या निवडणुकीनंतर महायुतीला मोठं यश मिळालं, तर महाविकास आघाडीला विधानसभेच्या निवडणुकीत मोठ्या अपयशाला समोरं जावं लागलं. विधानसभेला आलेल्या अपयशानंतर महा विकास आघाडीत बिघाडीची शक्यता वर्तवली जात आहे. याचं कारण म्हणजे महाविकास आघाडीतील नेते एकमेकांवर आरोप–प्रत्यारोप करत आहेत. यातच काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाने आगामी महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी तुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. असं असतानाच आता प्रहार संघटनेचे नेते तथा माजी मंत्री बच्चू कडू यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याबाबत मोठा दावा केला आहे. उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी कदाचित लवकरच केंद्रात भाजपाबरोबर दिसतील, असं सूचक विधान बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना केलं आहे. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत. बच्चू कडू यांच्या या विधानानंतर भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी प्रतिक्रिया देत त्यांचं हे विधान हास्यास्पद असल्याचं म्हटलं आहे.आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे दोन ते तीन विधेयक पास होण्यासाठी भाजपाबरोबर अडकून राहिले आहेत. मात्र, त्या दोन ते तीन विधेयकांवर शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची कदाचित केंद्रातील भाजपा सरकारला गरज पडणार आहे.

त्यामुळे राजकारणात मोठी राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता टाळता येत नाही, असा दावा बच्चू कडू यांनी केला आहे.





## महानगरात मोबाइल कंपन्यांची मनमानी

# २१७ टॉवर अनधिकृत, कोट्यवधी रुपये थकीत

### ८३ टॉवर उभारणीसाठी मंजूरी प्रदान : उर्वरित टॉवर नियमबाह्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती–** मंजुरी एका मोबाइल टॉवरची, पण त्या टॉवरवर एकापेक्षा अधिक मोबाइल कंपन्यांनी परस्पर टॉवर उभारण्याच्या धक्कादायक प्रकाराने आयुक्त सचिन कलंत्रे यांनादेखील 'शॉक' बसला आहे. महानगरात मोबाइल कंपन्याचे 'टॉवर पे टॉवर' यात कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न बुडाले असून, कंपन्या मात्र 'मालामाल' होत आहेत. साधारणतः २१७ अनधिकृत मोबाइल टॉवर असल्याची बाब पुढे आली आहे.

मोबाइल टॉवर उभारणी करण्यासाठी राज्य शासनाने नियमावली निश्चित केली आहे. असे असताना शहरात मंजुरी न घेता तब्बल २१७ अनधिकृत मोबाइल टॉवरची उभारणी केली असेल, तर ही कंपन्यांची अरेरावी म्हणावी लागेल. किंबहुना निवासी क्षेत्रात मोबाइल टॉवर नको, अशा तक्रारी अनेकदा नागरिकांकडून येतात. तथापि, या तक्रारींचा निपटारा न करता मोबाइल कंपन्यांना अभय दिला जातो.

**कोर्टाच्या नावे मोबाइल कंपन्यांचे चांगभले**

महापालिका वा अन्य यंत्रणांची परवानगी न घेता परस्पर मोबाइल टॉवर उभारणीचा सपाटा अमरावतीत सुरू आहे. प्रशासनाने कारवाई अथवा दंड वसुलीची प्रक्रिया आरंभली, तर या निर्णयाविरोधात मोबाइल कंपन्या न्यायालयात धाव घेतात. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात 'तारीख पे तारीख' असे सुरू झाले की, मोबाइल कंपन्यांनी 'टॉवर पे टॉवर' असा कारभार सुरू होतो.

**पाचही झोननिहाय मालमत्ता कर वसुलीचे निर्देश**

महापालिका आयुक्त सचिन १ कलंत्रे यांनी १३ जानेवारी रोजी उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने आढावा घेतला असता, मोबाइल टॉवर मंजुरीत प्रचंड गोंधळ असल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली.

आयुक्तांनी पाचही झोननिहाय मोबाइल टॉवरवर कार्यवाही करून मालमत्ता कर वसूल करण्याचे निर्देश सहायक आयुक्तांना दिलेत. तसेच, मोबाइल टॉवरसंदर्भात कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या होत्या.

महापालिका आयुक्त कलंत्रे ६३ यांनी १३ जानेवारी रोजी उत्पन्न बाबत आढावा घेतला असता अनधिकृत मोबाइल टॉवर उभारणीचे बिंग फुटले.

अनधिकृत मोबाइल टॉवरच्या ८३ अनुषंगाने कंपन्यांकडून ४ ते ५ कोटी रुपये थकीत महापालिकेला उत्पन्न अपेक्षित आहे. मात्र, यासंदर्भात ठोस पाऊले उचलले जात नाही.

> महापालिकेत आतापर्यंत केवळ ८३ मोबाइल टॉवर उभारणीची मंजूरी दिली आहे. उर्वरित टॉवर हे अनधिकृत असून, १ जानेवारीपासून ऑनलाइन मंजुरीची प्रक्रिया आरंभली आहे. एका मोबाइल टॉवरपासून लाख ते दीड लाखाचे उत्पन्न मिळते.
>
> **– घनश्याम वाघाडे, एडीटीपी, मनपा.**



# दोन हेल्मेट कसे सांभाळावे याची चिंता मिटली


## आता चक्क हेल्मेटची घडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नागपूर : –**भारतात व महाराष्ट्रात रस्ते अपघातात दुचाकी बळींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच दुचाकी अपघातामध्ये होणाऱ्या मृत्यूंची संख्या लक्षणीय आहे. दुचाकीस्वारांनी जर हेल्मेटचा वापर केला तर अपघातामध्ये होणाऱ्या मृत्युंच्या संख्येमध्ये निश्चित घट होऊ शकते. त्यामुळे वाहनचालकाने स्वतः आणि सोबत बसलेल्या व्यक्तीने रस्ता सुरक्षा मानकांची पूर्तता करणाऱ्या हेल्मेटचा वापर करणे अत्यावश्यक आहे.

तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम १३८ नुसार नवीन दुचाकी वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना, खरेदीवेळी वाहन वितरकाने दोन हेल्मेट पुरवणे आवश्यक आहे. याबाबत दुचाकी वितरकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे दोन हेल्मेट वापरणे अनिवार्य होणार आहे.

परंतु, वाहनासोबत दोन हेल्मेट सांभाळणे प्रचंड अडचणी असल्याने यावर नागपूर दोन जागतिक दर्जाच्या संशोधकांनी महत्त्वपूर्ण शोध लावला आहे. यामुळे हेल्मेटची घडी करून तो सहज हाताळता येणार आहे. हे संशोधन काय आहे? आणि कसा राहणार 'फोल्डिंग हेल्मेट' ते बघुया.



हेल्मेट घालून दुचाकी चालवणे सुरक्षेच्या दृष्टीने गरजेचे आहे. परंतु, हेल्मेट सांभाळणे हे वाहन चालकासाठी फार कठीण असते. त्यामुळे आता सुरक्षित घडी करून ठेवता येईल अशाप्रकारचे 'फोल्डिंग हेल्मेट' तयार करण्याचे कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दोन संशोधकांनी सुरू केले आहे. यावर संशोधकांना 'स्वामित्व हक्क'ही (पेटंट) मिळाले आहे.

भौतिक शास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे व एम.एस्सी.ची विद्यार्थिनी आदिती देशमुख यांनी हे संशोधन केले आहे.

# येवदा येथे कै.वासुदेवराव कोकाटे व्याख्यानमाला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२येवदा (दर्यापूर)**

जनविकास शिक्षण संस्था येवदाद्वारा संचालित कला वाणिज्य महाविद्यालय येवदा येथील सभागृहात कै. वासुदेवराव कोकाटे व्याख्यानमाला संपन्न झाली. या व्याख्यानमालेचे अध्यक्ष अलकाताई कोकाटे संचालिका जनविकास शिक्षण संस्था येवदा हे होते तर प्रमुख उपस्थिती गजाननराव कोकाटे सचिव . किरणताई कोकाटे सहसचिव देविदास कोकाटे तसेच नीलकंठ गणवीर दिलीप डवरे व संजय पखान उपस्थित होते. या व्याख्यानमालेत प्रथम पुष्प अविनाशजी दुधे यांनी सोशल मीडियाचा मानवी मेंदूवर सर्जिकल स्ट्राइक या विषयावर आपले व्याख्यान सादर केले. तर अर्चनाताई पखान यांनी नसत्या जिजाऊ तर नसते घडले शिवराय या विषयावर व्याख्यान आयोजित केले , याप्रसंगी अलकाताई कोकाटे जनविकास शिक्षण संस्था द्वारा संचालित संत नारायण गुरु विद्यालय गायवाडी येथून मुख्याध्यापक या पदावर सेवानिवृत्त झाल्याबद्दल कला वाणिज्य महाविद्यालय तर्फे त्यांचा सत्कार घेण्यात आला. तसेच कै, वाशी वासुदेवराव कोकाटे यांच्या पत्नी किरण ताई कोकाटे अविनाशजी दुधे सुप्रसिद्ध पत्रकार व अर्चनाताई पठाण यांचा शाल श्रीफळ व मोमेंटो देऊन सत्कार घेण्यात आला. मानवी मेंदूवर सोशल मीडियाचा जो सर्जिकल स्ट्राइक झालेला आहे, त्याचा आपल्या जीवनात प्रभाव पडू नये आणि सोशल मीडियाचा उपयोग मानवाने आपल्या विकासासाठी करावा असे प्रतिपादन केले. तसेच अर्चनाताई पखान यांनी मासाहेब जिजाऊ यांच्या चरित्राचा, कर्तृत्वाचा अत्यंत ज्वलंत आढावा घेत सविस्तर विवेचन सादर केले आणि स्त्रियांमध्ये हे गुण विकसित करण्यासाठी मा जिजाऊ साहेबांचे चरित्र वाचन करणे महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन केले. याप्रसंगी गजाननराव कोकाटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना वाचन संस्कृती ही जीवन संस्कृती असे विचार मांडले. तसेच प्राध्यापक वाय, जे, सिंग यांनी आपले मनोगत व्यक्त केले, महाविद्यालयातून संविधान, संविधानवाद आणि संवैधानिक नैतिकता या विषयावर प्रा. डॉ. संदीप डोंगरे आणि सुनील थोरात द्वारा संपादित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ.अतुल टेवरे व प्रास्ताविक डॉ.अनिल कत्रोजवार आणि, आभारप्रदर्शन डॉ.सुनिता सावरकर यांनी केले, याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी . मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्रा, वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला.



# रेशीम शेती करणार मालामाल

## शेतकऱ्यांना मिळणार ४.१८ लाखांचे अनुदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती** योग्य व्यवस्थापन, शासन योजनांचा लाभ, बाजारपेठेत वाढती मागणी व मिळणारा चांगला भावामुळे रेशीम शेती फायद्याची ठरत आहे. मनरेगा अंतर्गत ४.१८ लाखांचे अनुदानही मिळत आहे. शिवाय हमखास उत्पन्न मिळत असल्याने शेतकर्यांचा कल रेशीम शेतीकडे वाढला आहे.रेशीम शेती हा एक उत्तम जोडधंदा आहे व अल्प कालावधीचे पीक असल्याने दुसर्या वर्षापासून वर्षाला पाच पिके घेता येतात. तुतीच्या लागवडीनंतर १५ वर्षापर्यंत पुन्हा लागवड करण्याची गरज भासत नाही. या शेतीत ६० टक्क्यांपर्यंत महिलांचा सहभाग असल्याने रोजगार निर्मितीही होत आहे.रेशीम शेतीचे महत्त्व शेतकर्यांना कळावे, यासाठी ९ फेब्रुवारी दरम्यान महारेशीम अभियान जिल्ह्यात राबविण्यात येते. तुती रेशीम उद्योग, रेशीमशेतीचे महत्त्व व त्यातून मिळणार्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची शेतकर्यांना माहिती देण्यासाठी व तसेच शेतकर्यांना रेशीम शेतीसाठी नोंदणी करता यावी, यासाठी रेशीमरथ जनजागृती करीत असल्याची माहिती जिल्हा रेशीम अधिकारी दीपाली नागोलकर यांनी दिली.

**एका एकरात दीड लाखाचे उत्पन्न** – तुती लागवडीपासून पहिल्या वर्षी ५०० अंडीपुंजातून २५० किलोचे उत्पन्न होते. यामध्ये दोन पिके घेता येतात व दुसर्या वर्षी चार पिके व ५०० किलो कोष उत्पादन करता येते. दुसर्या वर्षापासून ५०० ते ६०० किलो कोषचे म्हणजे दीड ते दोन लाखांचे उत्पन्न मिळते. ४० ते ५० हजारांचा खर्च येतो, म्हणजे दीड ते दोन लाखांचे उत्पन्न मिळते.



> **ही पात्रता अन् कागदपत्रे आवश्यक**
>
> लाभार्थी हा अल्पभूधारक, अनु. जाती– जमातीमधील असावा, आठमाही सिंचनाची सुविधा असलेली बागायती, स्वतःची जमीन असावी. ग्रा.पं.चा मनरेगा आराखडा, ग्रामसभेचा ठराव, लाभार्थी जॉब कार्डधारक व मजूर म्हणून काम करणारा, तसेच सातबारा, ८ अ, जॉब कार्ड, आधार कार्ड, पासबुक झेरॉक्स व २ फोटो आवश्यक आहे

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवाडा उत्साहात संपन्न

## स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२ नांदगाव पेठ –**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन व विद्यार्थी कल्याण विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या निर्देशानुसार नांदगाव पेठ येथील स्वर्गीय दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत दिनांक १ ते १५ जानेवारी दरम्यान महाविद्यालया तील ग्रंथालय विभागाने सार्वजनिक वाचनालय नांदगाव पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शनी, सामूहिक वाचन ,ग्रंथ परीक्षण ,वाचन संवाद, वादविवाद स्पर्धा आदी उपक्रम राबविण्यात आले. ग्रंथप्रदर्शनी चे आयोजन महाविद्यालयातील ग्रंथालयात करण्यात आले. सदर ग्रंथप्रदर्शनीचे उद्घाटन संस्थेचे सचिव श्रीकृष्णजी बाळापुरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहसचिव भूषण पुसतकर, सदस्य रेवण पुसतकर तसेच महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय दरणे, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. ३ जानेवारी रोजी सामूहिक वाचन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ४७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. दिनांक ६ जानेवारी रोजी महाविद्यालयात 'नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात विकास होत आहे' या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालया तील ३३ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. इतिहास विभाग प्रमुख डॉ गोविंद तिरमनवार व मराठी विभाग प्रमुख डॉ पी आर जाधव यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. सामूहिक वाचन आणि वाचन संवाद हा कार्यक्रमही घेण्यात आला. सामूहिक वाचनाच्या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सलग आठ तास ग्रंथालयात बसून सामूहिक ग्रंथवाचन केले. वाचन संवाद या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात काही निवडक विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांवर संवाद साधून पुस्तकातून मिळालेल्या प्रेरणादायी बाबींवर मत व्यक्त केले. काही विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण ग्रंथपालांकडे सादर केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने आयोजित सर्व उपक्रमासंदर्भात एक छोटीशी पुस्तिका महाविद्यालयाच्या वतीने तयार करण्यात आली. सदर पुस्तकाचे प्रकाशन २६ जानेवारी रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. महाविद्यालयात आयोजित या सर्व उपक्रमांसाठी प्राचार्य डॉ. विजय दरणे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल डॉ. विकास अडलोक आणि श्री दिलीप पारवे यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी या उपक्रमाला सहकार्य केले. सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने हा उपक्रम संपन्न केला.



# रसायनशास्त्र संशोधक झाला आंत्रप्रेन्योर....

## राष्ट्रीय कृषि विकास योजना (रफ़्तार) द्वारे अमरावती जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच झाली निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती –**

चांदूरबाजार तालुक्यातील बेलमंडळी गावातील युवकाने शेतकर्यांना त्रस्त करून सोडणार्या शंखी या शत्रू किडींचा नायनाट करण्याचा फॉर्मुला तयार केला. शेतकर्यांच्या शेतातील प्रयोगात त्याची परिणामकारकता सिद्ध झालेली आहे. त्यामुळे शेतकर्यांना निश्चितच मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे.डॉ. प्रतीक किशोरराव देशमुख असे या शस्त्रज्ञाचे नाव आहे.श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनशास्त्रात त्यांनी आचार्य (पीएच.डी.) प्राप्त केली असून प्रोफेसर राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रीसर्च येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

२०१६ या वर्षी बेलमंडळी येथील शेतात संत्रा झाडांवर त्यांना शंख दिसले. त्यामुळे खुप नुकसान होत होते. या किडींचा नायनाट फवारणीने शक्य नव्हता.तसेच झाडावरून एकेक शंखी वेचणे हे पण महाकठीण होते. बागायतदारांची ही अवस्था पाहून शंख नियंत्रणासाठी अभ्यास सुरू केला. प्रयत्न करुन शंखांना आकर्षित करणारे विविध पदार्थांचा अभ्यास करुन त्यांनी यशस्वीरित्या एक द्रावण तयार केले. या यशासाठी त्यांना वसंतराव नाईक कृषी प्रतिष्ठान मुंबई तर्फे २०२१ साली पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. तसेच आदर्श कृषिसेवक हा बहुमान २०२२ साली प्राप्त झाला.



याच दरम्यान महाराष्ट्रातील या क्षेत्रात कार्यरत शास्त्रज्ञांसोबत त्यांचा संपर्क आला. पुणे येथील 'द फार्म' च्या प्रेरणेतून स्टार्टअप चा विचार पुढे आला. माहिती मिळाली. व विविध सरकारी संस्थांना अर्ज केले. गेल्याच वर्षी 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ अग्रिकल्चर मार्केटिंग जयपुर' येथील ग्री इनोव्हेशन अँड इनक्यूबॅशन सेंटर येथे संशोधनाचे सादरीकरण त्यांनी केले.

राष्ट्रीय कृषी विपणन संस्था ही भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या मालकीची एक स्वतंत्र संस्था आहे. देशभरातून इथे आलेल्या कृषी संशोधकांना त्यांच्या संशोधनाचे रूपांतर स्टार्टअप मध्ये करण्यासाठी अनुदान दिल्या जाते व मार्गदर्शन पण करतात. वर्षभर चाललेल्या सादरीकरणानंतर देशभरातून निवडल्या गेलेल्या मोजक्या संशोधकांमध्ये डॉ. श्री. प्रतीक देशमुख यांच्या प्रकल्पाची निवड ही अत्यंत अभिमानास्पद आहे.राष्ट्रीय कृषी विपणन संस्थेच्या मार्केटिंग मैनेजर शाश्वती मुखर्जी या प्रक्रियेमध्ये मार्गदर्शिका म्हणून आहेत.या प्रवासात त्यांना श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. एम देशमुख, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे रसायनशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. प्रशांतजी मंडलिक, प्राचार्य –प्रोफेसर राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च बडनेरा व सहकारी , घाटलाडकी येथील श्री. सागर कपले, कृषी विज्ञान केंद्र घाटखेड, बायोमी चे संचालक डॉ. प्रफुलजी घाडगे, फार्म चे संचालक रितेशजी पोपलघाट, श्री. सर्वेश घंगाले तसेच प्रयोगशील शेतकरी श्री सचिन देशमुख, श्री. विकास देशमुख, श्री. मुकुल देशमुख , श्री. ज्ञानेश्वर कडू ,श्री. इर्शाद अहमद,श्री. आकाश जयसिंगपुरे, श्री. दीक्षित खाजोने,श्री. राहुल राजस व श्री. अजय तह्लेकर यांचे सहकार्य लाभले.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथील तांत्रिक सोहळ्यात हॅकॅथॉन २०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी सादर केले नाविन्यपूर्ण कौशल्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या टेकलॉन्स २०२५ या तांत्रिक कुंभ मेळाव्यात वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यामध्ये विद्यार्थ्यांना आपले कला कौशल्य दाखवत पारितोषिक जिंकण्याची संधी मिळते. पी. आर. पोटे पाटील ग्रुप च्या वतीने यावर्षी सुद्धा विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालणा देण्यासाठी आणि त्यांच्या नाविन्यपूर्ण विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी पहिल्यांदाच मोठ्या पातळीवर हॅक्थॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धे मध्ये विद्यार्थ्यांनी आपली नाविन्यपूर्ण कौशल्ये आणि तांत्रिक सर्जनशीलता सादर करत समाजातील व उद्योग क्षेत्रातील समस्यांवर आधुनिक तांत्रिक उपाय शोधून सादर केले. हॅक्थॉन स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, कोल्हापूर, संभाजीनगर, नांदेड, धाराशिव, सातारा , धुळे, शिरपूर, नागपूर, सांगली, वर्धा नाशिक मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेला ४३५ स्पर्धकांनी सहभाग घेत विविध समस्यांसाठी नाविन्यपूर्ण डिजिटल उपाय सुचवत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

भारत सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वाखाली एआयसीटीई व मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन अंतर्गत भारतातील विद्यार्थ्यांकरिता विविध क्षेत्रातील समस्येवर उपाय शोधण्याकरिता स्मार्ट इंडिया हॅक्थॉन या स्पर्धेला सुरवात केली ज्या मध्ये सहभागी होणारे व्यक्ती किंवा संघ एका निश्चित कालावधीत विविध तांत्रिक समस्या सोडवण्यासाठी काम करतात. हॅक्थॉनमध्ये सहसा सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, प्रोग्रामिंग, आणि नाविन्यपूर्ण




विचारांचे प्रात्यक्षिक सादर केले जाते.

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपची २०२३ मध्ये स्मार्ट इंडिया हॅक्थॉन चे आयोजनाकरिता भारत सरकार द्वारा निवड करण्यात आली होती तसेच या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन संस्थेच्या वतीने करण्यात आले. त्याचप्रमाणे स्मार्ट इंडिया हॅक्थॉन २०२२,२०२३,२०२४ च्या स्पर्धे मध्ये पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारितोषिके सुद्धा जिंकली आहेत. हॅक्थॉन स्पर्धा पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेवर आधारित आहे, ज्यात तंत्रज्ञान आणि नवकल्पनांद्वारे देशाच्या विकासात योगदान देण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळते. आपल्या विभागासह संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांपर्यंत ह्या स्पर्धेचा विस्तार वाढवण्यासाठी टेकलॉन्स २०२५ हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे तसेच आजच्या युवाशक्तीला तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त करण्याची आणि ते समाजाच्या उपयोगासाठी पुढे आणण्याची एक उत्तम संधी मिळाली असून हॅक्थॉन स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे नाविन्यपूर्ण विचार, तांत्रिक कौशल्य आणि सर्जनशीलता प्रदर्शित होईल, जे देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरू शकते असे मत संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी व्यक्त केले.

हॅक्थॉन स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना सुप्रसिद्ध सुपर ३० चे संस्थापक आनंद कुमार यांनी स्फूर्तीदायक मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन तज्ज्ञ सचिन पांडे सीईओ, स्किलशिप फाउंडेशन, नागपूर ,हर्षित जयस्वाल सायबर सिक्युरिटी इंजिनिअर, विप्रो , रोहित बजाज सॉफ्टवेअर इंजिनिअर, टीसीएस, नागपूर, विक्रम गंगोटे प्रोजेक्ट डेव्हलपमेंट इंजिनिअर, डॉक्सप्रो रोबोटिक्स प्रा. लि. यांनी परीक्षक मंडळ म्हणून काम सांभाळले.

हॅकॅथॉन २०२५ मध्ये तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. या स्पर्धेतील उत्कृष्ट संघांना बक्षिसे देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यात पहिला क्रमांक कोल्हापूरच्या केआयटी संस्थेच्या संघाने आपला तांत्रिक प्रकल्प सादर करून ₹५१,००० चे पारितोषिक पटकावले दुसरा क्रमांक संभाजीनगरच्या एमआयटी संस्थेच्या संघाला ₹३१,००० चे बक्षिस मिळाले तिसरा क्रमांक अमरावतीच्या पीआरपीसीईएम संस्थेच्या संघाने ₹११,००० चे बक्षिस मिळवले.

हॅक्थॉन २०२५ मधील विजेत्या संघाचे पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अध्यक्ष मा .आ. श्री प्रविण पोटे पाटील, उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया आणि उपप्राचार्य डॉ. एम. झुहेर यांनी अभिनंदन केले.


हॅक्थॉन २०२५ च्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख डॉ. व्ही. बी. गाडिचा, शैक्षणिक समन्वयक प्रा. एम. एस. बुरंगे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. आर. चोपडे आणि प्रा. ए. ए. तायडे यांनी योगदान दिले. विद्यार्थ्यांचे समन्वयक म्हणून करमीर ओबेरॉय आणि सुजल भुगळ यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

हॅक्थॉन स्पर्धेने विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण विचारांना आणि तांत्रिक कौशल्यांना वाव देऊन त्यांना उद्योग आणि संशोधन क्षेत्रात आपले स्थान निर्माण करण्याची प्रेरणा दिली.

# गृहमंत्री अमित शाह शुक्रवारी करणार नाशिक दौरा; घेणार त्र्यंबकराजाचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२नाशिक**

गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शाह हे शुक्रवारी २४ जानेवारी रोजी नाशिक जिल्हा दौऱ्यावर जाणार आहेत. यावेळी ते त्र्यंबकराजाचे दर्शन घेणार असून त्यांची सहकार परिषद देखील आयोजित करण्यात आली आहे. त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तिनाथ यात्रेच्या कालावधीत शहांचा हा दौरा होणार असल्याने त्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.



गृहमंत्री अमित शाह यांचे शुक्रवारी सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांनी विमानतळावर आगमन होणार असून बीएसएफच्या हेलिकॉप्टरने ते त्र्यंचककडे प्रस्थान करणार आहेत. त्यानंतर १२ वाजून २० मिनिटांनी त्र्यंबक येथील हेलिपॅडवर त्यांचे हेलिकॉप्टर उतरेल, तेथून ते मोटारीने त्र्यंबके वर मंदिराकडे प्रस्थान करतील. साडेबाराच्या सुमारास त्र्यंबकेश्वर मंदिरात आगमन होणार असून त्याठिकाणी ते त्र्यंबकराजाचे दर्शन, पूजन करणार आहेत. मंदिरातील पूजेसाठी वीस मिनिटांचा कालावधी आरक्षित असणार आहे. त्यानंतर दुपारी एकला ते हलिकोप्टरने मालेगावकडे स्वाना होतील.

दुपारी दोनला गृहमंत्री शाह हे मालेगाव तालुक्यातील अजंग गावातील वेंकटेश्वरा को ऑपरेटिव्ह फर्मला भेट देणार आहेत. याठिकाणी सहकार परिषद आयोजित करण्यात आली असून त्यानंतर ते विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. दुपारी साडेतीनला बीएसएफच्या हेलिकॉप्टरने ते ओझर विमानतळावरून वीएसएफच्या विमानाने मुंबईकडे परततील.

# मालमत्ता कर थकवणाऱ्या नागरिकांना जप्तीपूर्व नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अम्मरावती**

थकीत मालमत्ता करधारकांना मनपाकडून जातीपूर्व नोटीस देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मालमत्ता कर न भरणाऱ्यांना जप्ती व लिलावाची कारवाई टाळायची असेल तर त्यांना यापुढे मालमत्ता कर भरणे क्रमप्राप्त आहे.३९०५ मालमत्ता धारकांकडेच १२१ कोटींचा कर थकीत आहे. त्यांची यादी तयार केली असून, त्यांना जप्तीपूर्व पहिली नोटीस पाठवण्याची तयारी मनपा प्रशासनाने सुरू केली आहे. यानंतर त्यांना दुसरी जप्तीची -नोटीस पाठवली जाईल. त्यानंतरही त्यांनी कर भरला नाही तर त्यांच्या विरोधात कठोर कारवाईसाठी मनपाद्वारे पावले उचलली जातील. अनेक वर्षांपासून त्यांनी करच भरला नसल्याने मनपाला आर्थिक चणचण भासत आहे. मनपाच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत मालमत्ता कर आहे. जेवढा मालमत्ता कर जमा होईल, तेवढीच शहरातील विकासकामे करणे सुलभ होणार आहे.

## जप्तीची कारवाई होणारच



मालमत्ता कर थकीत ठेवणा-यांविरोधात याआधी कठोर कारवाई झाली नाही. परंतु, आता जप्तीची कारवाई होणारच. मनपाचा १०० कोटी मालमत्ता कर थकीत असल्यामुळे पहिल्या टप्प्यात नोटीस पाठवण्यात आल्या आहेत.

**-सचिन कलंत्रे, आयुक्त, मनपा.**

# आमदार उमेश यावलकर यांच्या कार्यालयात भाजप सदस्यता अभियानासाठी विशेष बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२वरुड**

भारतीय जनता पार्टीच्या सदस्यता अभियानाला गती देण्यासाठी आमदार उमेश यावलकर यांच्या कार्यालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत आमदार उमेश यावलकर यांनी भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत सदस्यता वाढीसाठी ठोस उपाय सुचवले.

बैठकीत बूथ प्रमुखांना त्यांच्या भागातील नागरिकांशी संपर्क साधून भाजप विचारसरणीचा प्रचार करण्याचे निर्देश देण्यात आले. जास्तीत जास्त लोकांना सदस्यत्वासाठी प्रेरित करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करायचा यावर चर्चा झाली. सदस्य नोंदणी प्रक्रिया सुलभ आणि प्रभावी करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात आल्या.

आमदार उमेश यावलकर यांनी सांगितले की, प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या तर सदस्यता अभियान मोठ्या प्रमाणावर यशस्वी होईल. त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले की, भाजपा विचारधारा लोकांपर्यंत पोहोचवून पक्ष अधिक मजबूत करावा.

बैठकीत सदस्य नोंदणी अभियान विस्तारक राजेश निस्ताने यांनी यथोचित मार्गदर्शन केले, तर भाजपा वरुड शहर अध्यक्ष योगेश्वर खासबागे यांनी प्रास्ताविक केले. या बैठकीत मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांचा सहभाग दिसून आला, तसेच अभियान यशस्वी करण्यासाठी उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

# कायदा करून देवस्थान शेत जमीन प्रकरणांना आळा घाला

## तिवसा तालुका मंदिर विश्वस्त बैठकीत आ. वानखडेंना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२गुरुकुंज मोझरी**

श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम, मोझरी येथे तिवसा तालुका मंदिर विश्वस्थांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीला तालुक्यातील १२५ हून अधिक विश्वस्त उपस्थित होते. बैठकीला आ. राजेश वानखेडे यांनी सुद्धा हजेरी लावली होती.

देवस्थान शेतजमीन प्रकरणांना आळा घालण्यासाठी सक्षम कायदा म्हणून अँटी लँड ग्रॅबिंग क्टची तरतूद राज्य शासनाने करावी यासंदर्भातील निवेदन महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने आ. राजेश वानखडे यांना देण्यात आले. त्यांनी याबाबत राज्य शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे स्पष्ट केले. श्री महारुद्र मारोती संस्थान,जहागीरपूर येथे ९ मार्च



२०२५ रोजी होणाऱ्या अमरावती जिल्हा मंदिर विश्वस्त अधिवेशनाबाबत बैठकीमध्ये माहिती देण्यात आली.बैठकीचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ आश्रमाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे गुरुजी यांनी भुषवले. मंदिर प्रशासन, शेत जमीन प्रकरणे व धार्मिक विषयावर अॅड. रमण जयस्वाल, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल, हिंदू जनजागृती तिचे जिल्हा समन्वय नीलेश टवलारे यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र मंदिर महासंघाद्वारे अल्पावधीमध्येच मंदिरांच्या शेतजमिनी व मंदिर संस्कृतीच्या रक्षणासाठी सुरू केलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. या कार्यासाठी आम्ही सदैव महासंघाच्या सोबत राहू.त्याकरिता आमच्याकडून नेहमी सहकार्य राहील, असे मनोगत बोथे गुरुजी यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. बैठकीचे संचालन रूपेश राऊत यांनी केले.

बैठकीला डॉ. राजाराम बोथे, प्रदीप गर्गे, जहागीरपूर संस्थानचे अध्यक्ष ओमप्रकाश परतानी, महासंघाचे जिल्हा संयोजक कैलाश पनपलिया, विनोद पटेल, सचिन वैद्य, गजानन जवंजाळ, राहुल तडस व इतर मंदिरांचे विश्वस्त उपस्थित होते. यासह मानवता संस्थान दासटेकडी, सोटागिर महाराज संस्थान, रामचंद्र संस्थान मोझरी, दुर्गा देवी संस्थान तळेगाव ठाकूर, श्री रामदेव बाबा दुर्गादेवी, तिवसाचे विश्वस्तही या वेळी उपस्थित होते.

# महिला महाविद्यालय कनिष्ठ विभाग येथे निरोप समारंभ संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय (कनिष्ठ विभाग) जोग चौक, अमरावती येथे सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी बारावीच्या विद्यार्थिनीं करिता निरोप समारंभ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील हे अध्यक्षस्थानी तर कनिष्ठ विभागाच्या पर्यवेक्षिका माधुरी सोनपरोते आणि शिक्षक प्रतिनिधी प्रा. मंजिरी वळसे या उपस्थित होत्या. याप्रसंगी बारावी कला शाखेची विद्यार्थिनी कस्तुरी शेरेकर, खुषी भारुडकर बारावी कॉमर्स ची विद्यार्थिनी चंचल साखरकर, अंजली डोफे, बारावी सायन्स ची जानवी शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करून महाविद्यालयाप्रती आणि आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. अविनाश मोहरील यांच्या मार्गदर्शनाने आणि प्रेरणे मुळे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास वाढल्याचे प्रांजळपणे कबूल केले. या प्रसंगी



बारावी विज्ञान शाखेची कु. गरिमा चव्हाण हिने सुमधुर गीत गायन केले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे अकरावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या सीनियर साठी म्हणजे बारावीच्या विद्यार्थ्यांनी करिता विशेष असे आमंत्रण पत्र तसेच शुभेच्छा पत्र तयार करून बारावीच्या प्रतिनिधींना दिले. याकरिता चैताली मानकर, वंशिका दुर्गे, श्रावणी पोटे, वेदिका मानकर, ऋतुजा तायडे, संमती डोंगे, टीना उमाळे, वैष्णवी कांबळे , मधुश्री राऊत या विद्यार्थिनींनी विशेष मेहनत घेतली. पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते मॅडम यांनी विद्यार्थिनींना बारावी बोर्डाच्या परीक्षेच्या संदर्भात महत्त्वाच्या सूचना दिल्या तसेच येणाऱ्या परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या.आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी विद्यार्थिनींना राष्ट्रीय शिक्षण प्रणाली करीता तयार राहण्यास सांगितले. येणाऱ्या काळात विद्यार्थिनींनी सक्षम होणे गरजेचे असून त्याकरिता विद्यार्थिनींनी आपल्या मधले कौशल्य, ज्ञान वाढविणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले आणि महिला महाविद्यालय याकरिता विद्यार्थिनींच्या सतत पाठीशी असल्याची ग्वाही विद्यार्थिनींना दिली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी विशेष गीत गाऊन वातावरणात नवचैतन्य आणले. पालक संस्था नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मायाताई शिराळकर तसेच सहसचिव श्री. निनाद सोमण, संस्थेच्या सहसचिव प्रा. ममता पांडे तसेच संपूर्ण कार्यकारणी मंडळ यांनी विद्यार्थिनींना येणाऱ्या बारावी बोर्डाच्या परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या आहेत. कार्यक्रमाचे सुरेख संचालन कनक सरदार आणि वेदिका गहूकार तसेच आभार प्रदर्शन साक्षी चरखे या अकरावीच्या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता निरोप समारंभ आयोजन समिती प्रमुख प्रा. डॉ. जयश्री वैष्णव प्रा. अपर्णा तीनखेडे प्रा. कांचन परतेकी यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी सर्व नियमित तसेच सिएचबी प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महायुतीत तोंड दाबून बुक्क्यांचा मार..... अभिजीत अडसूळ यांची राणा दाम्पत्यावर टीका

## जिल्ह्यात महायुतीतील घटक पक्षांमधील बेबनाव उघडपणे आला समोर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

विधानसभा निवडणुकीदरम्यान जिल्ह्यात महायुतीतील घटक पक्षांमधील बेबनाव उघडपणे समोर आला. पण, आता सत्ता स्थापनेनंतर देखील ही धुसफूस सुरूच आहे. दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांना पराभव पत्करावा लागला. यात महायुतीतील घटक असलेल्या युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा यांनी अडसूळ यांच्या विरोधात उमेदवार दिल्याने अडसूळ यांचा पराभव झाल्याची खंत शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते अजूनही व्यक्त करतात. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विविध पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली असताना पुन्हा एकदा महायुतीतील संघर्ष पुन्हा एकदा उफाळून येण्याची शक्यता आहे.

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना शिंदे गटाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना अभिजीत अडसूळ यांनी राणा दाम्पत्याचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली. अभिजीत अडसूळ म्हणाले, महायुतीत तोंड दाबून बुक्क्यांचा मार सुरू आहे. आमच्या पक्षश्रेष्ठींनी कुणाच्याही विरोधात बोलू नका, असे आम्हाला सांगितले होते. पण, आमच्या विरोधात मित्रपक्षानेच उमेदवार दिला. उमेदवाराला पक्षातून काढल्या गेले, पण त्यांचा प्रचार करणाऱ्या स्टार प्रचारक, आमदार किंवा पदाधिकाऱ्यांवर कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही. लोकांमध्ये त्यावेळी महायुतीचा नक्की उमेदवार कोण, याविषयी चुकीचा संदेश गेला आणि त्याचा फटका आम्हाला बसला. आम्ही विरोधात बोललो असतो, तर संपूर्ण महाराष्ट्रात त्याचा परिणाम झाला असता. महायुतीचे वातावरण बिघडले असते. आम्ही तोड दाबून बुक्क्यांचा मार सहन केला. त्यामुळे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे.महापालिकेच्या निवडणुकीच्या तयारीविषयी बोलताना अभिजीत अडसूळ म्हणाले, शिवसेना शिंदे गटाने स्वबळावर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढवाव्यात अशी आमची विनंती राहील. याविषयी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अंतिम निर्णय घेतील. पण पूर्वानुभव लक्षात घेता, आम्ही शांत राहण्याची भूमिका घेतली, तर नुकसान आमचेच होते, हे कार्यकर्त्यांच्या लक्षात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आमच्या विरोधात मित्रपक्षांकडून उमेदवार दिले जाणार आणि आम्ही त्यांच्या विरोधात बोलूही शकणार नाही. आम्ही मित्रपक्षांना साथ दिली नाही, तर त्याविषयी संपूर्ण महाराष्ट्रात चुकीचा संदेश जातो. महायुतीला त्रास होऊ नये, म्हणून आम्ही संयमाची भूमिका घ्यायची, मात्र मित्रपक्षांच्या चुकीच्या वागण्यामुळे आम्हाला फटका बसतो. हे कुठपर्यंत सहन करायचे, याचा विचार करावा लागेल.

# सीपी नविनचंद्र रेड्डी पुन्हा ॲक्शनमोडवर

## वसंत हॉलमध्ये आता प्रलंबित गुन्ह्यांसाठी आयओंची शाळा

### ४ वर्षापासून पेडींग गुन्ह्यांची माहिती मागविली सर्व ठाणेदारांना गतीने तपास करण्याचे आदेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी काही दिवसांपूर्वी वसंत हॉलमध्ये नागरिकांनी केलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी कार्यशाळा घेतली आहे. आता सीपी रेड्डी यांनी पोलिस ठाण्यात प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांचा तपास गतीने होण्यासाठी आजपासून वसंत हॉलमध्ये आयुक्तालयातील सर्व ठाणेदारांची कार्यशाळा भरली आहे. प्रत्येक पोलिस ठाण्यात ४ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांचा गोषवारा सीपींनी मागविला आहे. शहरातील नागरिक पोलिस ठाण्यात किंवा पोलिस आयुक्तालयातील आवक जावकमध्ये तक्रारी करतात.बहुतांश जण सीपींना भेटून त्याच्याकडे तक्रारी करतात. अशा तक्रारी पत्रव्यवहार शाखे मार्फत संबधीत पोलिस ठाण्यात जातात. दरम्यान पोलिस ठाण्यांमध्ये दैनंदिन कामकाज, बंदोबस्त, तपास, आरोपीची शोध अशा अनेक कारणांमुळे तक्रार अर्ज पेडींग राहत असल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप होतो. त्यामुळे सीपी रेड्डी यांनी स्वतः वसंत हॉल येथे नागरिकांसाठी १३ जे १६ जानेवारी दरम्यान तक्रार निवारण कार्यशाळचे आयोजन केले होते. त्या कार्यशाळेत सर्व पोलिस ठाण्यातील तब्बल ३७२१ तक्रार अजर्जापैकी ३१५२ तक्रारींचा ऑन दस्पॉट निपटारा करण्यात आला होता. तसेच ११ अजांवर गुन्हे दाखल करण्यात होते. आता सीपी रेड्डी यांनी पोलिस ठाण्यात प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांचा तपास गतीने होण्यासाठी आजपासून वसंत हॉलमध्ये आयुक्तालयातील सर्व ठाणेदारांची कार्यशाळा भरली आहे. प्रत्येक पोलिस ठाण्यात, वाहतुकसह इतर सर्व शाखेत ४ वर्षापासून प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांचा गोषवारा सीपीनी मागविला आहे, गुन्हयाचा तपास पेंडींग का, तपास करतांना अधिकारी, कर्मचाऱ्यांना काही अडचणी आहेत का, एखाद्या आयओने जाणीवपूर्वक तपास प्रलंबीत ठेवला का, आयओची बदली झाल्यानंतर ज्यांच्याकडे तपास आला त्यांनी का तपास केला नाही, न्यायालयाच्यास्टेमुळे काही तपास पेडींग आहेत का, या सर्व बाजू वसंत हॉलमध्ये सीपींच्याशाळेत तपासल्या जाणार आहेत. यावेळी मंचावर सीपी रेड्डींसह डीसीपी गणेशशिंदे, सागर पाटील, कल्पना बारवकर उपस्थित होते. तसेच कार्यशाळेल सर्व एसीपी, ठाणेदार व शाख प्रमुख उपस्थित होते.

# बहिरमच्या शंकरपटाला शेतकरी, प्रेक्षकांची तुफान गर्दी

## गर्दीचा वीस वर्षांचा रेकॉर्ड मोडला : बैलगाडा शर्यतीत आली रंगत : शेकडो बैलगाडा स्पर्धकांचा सहभाग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चांदुर बाजार**

बहिरमची यात्रा म्हटलं की, प्रहारच्या शंकरपटाची धूम पाहण्यासाठी दूरवरून प्रेक्षक आणि शेतकरी या यात्रेत येतात.२१ जानेवारीपासून सुरू असलेल्या प्रहारच्या शंकरपटाला बघण्यासाठी प्रेक्षक आणि शेतकऱ्यांनी तुफान गर्दी केली आहे. शेकडो बैलगाडा स्पर्धकांनी शंकरपटात सहभाग घेतला असून गर्दीने वीस वर्षांचा रेकॉर्ड मोडल्या गेला.प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आयोजित या शंकरपटात बैलगाडा स्पर्धकांचा उत्साह देखील पाहण्यासारखा होता. पहिल्या दिवसापासूनच या शंकरपटाला गर्दीचे स्वरूप प्राप्त झाले.पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी या शंकरपटात सहभाग घेतला आहे. एकापेक्षा एक सरस अश्या बैलजोड्या या स्पर्धेत उतरल्या असून हा शंकरपट सध्या बहिरम यात्रेचे आकर्षण ठरत आहे.या शंकरपटात गणेश कावलकर, वाढोना यांच्या -लकी- चिमणा या जोडीने६.५२ सेकंद ( क - गट)मोहसीन पटेल, जांभळी यांच्या देवाभाई - मैभ्या या जोडीने ६.५५सेकंद (अ गट), कु. मिशु अनविका राठोड यांच्या मिसाईल - देवा य जोडीने ६.५२ सेकंद (अ.गट) प्रशांत हरिभाऊ मोरे, बुलढाणा भीमा - लाडक्या या जोडीने ६.४९ वायूवेगाने अंतर कापून अंतिम सामान्य प्रवेश केला आहे. उद्या या शंकरपटाचा अंतिम सामना असून अतिशय रंगत या शंकरपटाला येणार आहे. गुरुवारी नियोजित वेळेवर अंतिम शर्यत खेळल्या जाईल व त्यांनतर प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू व मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देण्यात येणार आहे.दोन दिवस अत्यंत उत्साहपूर्ण सुरू असलेल्या या शंकरपटाला बघण्यासाठी दूरवरून प्रेक्षक व शेतकरी उपस्थित झाले असून दोन्ही दिवस गर्दीने वीस वर्षांचा रेकॉर्ड मोडला गेला आहे.बच्चू कडू यांनी बहिरम यात्रेमध्ये विविध उपक्रम राबविले असून नागरिक भाविकांच्या वतीने मोठ्या प्रमाणात त्या उपक्रमांचा लाभ घेतल्याजात आहे.

# शिरजगांव मो. येथे समाजप्रबोधनकार सप्तखंजेरी वादक सत्यपाल महाराज यांचा कीर्तनाचा कार्यक्रम

## देशसेवेसाठी कार्यरत असलेल्या जवानांच्या मातेचा झाला सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२शिरजगांव मो.**

तिवसा तालुक्यातील शिरजगांव मो. येथे लहानऊजी महाराज पुण्यतिथी महोत्सव निमित्त दि. २१ जानेवारी २०२५ रोजी साय. ७वाजता समाजप्रबोधनकार सप्तखंजेरी वादक सत्यपाल महाराज यांचा कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

तत्पूर्वी तिवसा विधानसभा आमदार राजेश वानखडे यांच्या पत्नी सौ आरती राजेश वानखडे यांच्या हस्ते शिवाजी महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज, बाबासाहेब आंबेडकर, लहानऊजी महाराज यांच्या फोटोचे पूजन करून हारअर्पण करण्यात आले. यावेळी गावचे सरपंच निरंजन कडू, पोलीस पाटील शारदा देवघरे, सदस्य सुषमा गाडगे, कुमुद बेले,कार्यक्रमचे व्यवस्थापक संजय गाडगे उपस्थित होते.आजचा तरुण दिवसेंदिवस व्यसनाधीन होऊन तरुणांचे भवितव्य धोक्यात असल्याने तरुणांनी सजग होऊन समाजासाठी वा देशसेवेसाठी समोर जाण्याची गरज आहे तरच देश घडेल असे प्रतिपादन आपल्या कीर्तनातून केले.ज्या पालकांनी मुलं घडविले ज्या पालकांनी आपल्या मुलांना देश रक्षणासाठी पाठविले अशा शिरजगाव मो. मधील सर्वाधिक देशसेवेसाठी कार्यरत असलेल्या तरुणांचे भरभरून कौतुक करून आईवडिलांचा सत्कार केला.गाडगेबाबांनी आपल्या घराचा त्याग करून जीवनभर समाजसेवा केली.भुकेलेल्यांना अन्न, तहणलेल्यांना पाणी, निराधारांना आधार, गोरगरीबांच्या लेकरांना शिक्षण हा संदेश अख्या देशात दिला.तर तुकडोजी महाराजांनी आपल्या अनेक भजनातून समजप्रबोधन केले.ते तुम्ही अंगीकारून देशाचं कल्याण करा. असा संदेश सत्यपाल महाराजांनी आपल्या कीर्तनातून हजारो भक्तांना केला.

# वरुड-मोर्शीतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी मंजूर

## आमदार उमेश यावलकर यांच्या प्रयत्नांना यश : वरुड-मोर्शीतील शेतकऱ्यांसाठी दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२वरुड**

वरुड तालुक्यातील बेनोडा महसूल मंडळात दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री दरम्यान अचानक आलेला पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. त्यामुळे नुकसान भरपाई मिळण्यासंदर्भात दिनांक ९ जानेवारी २०२५ रोजी मंत्रालय मुंबई येथे संबंधित विभागाचे मंत्री व सचिव यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला. तसेच तातडीने नुकसान भरपाई मिळण्याबाबत मदत व पुनर्वसन मंत्री मकरंदजी जाधव साहेब यांच्याकडे विनंती करण्यात आली होती. दरम्यान आज दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी शासन स्तरावरून नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासन आदेश पारित करण्यात आला आहे. त्यामुळे आता लवकरच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे.

आमदार उमेश यावलकर यांनी वेळोवेळी मंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला, तर मदत व पुनर्वसन मंत्री मकरंदजी जाधव यांची सकारात्मक भूमिका यशस्वी ठरली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देणे हे माझे प्राथमिक कर्तव्य आहे. शेतकऱ्यांसाठी माझा लढा कायम राहील, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, व मदत मंत्री मकरंदजी जाधव यांच्या प्रयत्नांमुळे हा निर्णय शक्य झाला. या निधीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. शेतकऱ्यांनी आमदार उमेश यावलकर यांचे आभार व्यक्त केले.

# प्रवासामध्ये दागिने चोरणाऱ्या पाच महिलांची टोळी जाळ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

प्रवासादरम्यान महिलांना लक्ष्य करून त्यांच्या बॅगमधून सोन्याचे दागिने लंपास करणारी महिला लुटारूंची टोळी शहरात सक्रिय झाली होती. शहर पोलिस अनेक महिन्यांपासून या टोळीच्या मागावर होते. दरम्यान मंगळवारी - दुपारी शहरातील बेनाम चौकात बसमधून या टोळीला विशेष पथकाचे पीआय आसाराम चोरमले व त्यांच्या पथकाने पकडले आहे.

विशेष पथकाने पकडलेल्या पाच महिला लुटारूपैकी दोघी यवतमाळ तर तिघी नांदेडच्या आहेत. पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे एका बसमध्ये चढून सुरुवातीला दोन महिलांना ताब्यात घेतले, त्यानंतर काही वेळातच राजापेठ बसस्थानक परिसरातून आणखी तिघीना ताब्यात घेतले. यवतमाळ येथील असलेल्या दोन महिलांनी शहरातील खोलापुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुन्हा केल्याचे समोर आले. त्यामुळे विशेष पथकाने दोघींना खोलापुरी गेट पोलिसांच्या ताब्यात दिले. तसेच तिघींनी नांदेड जिल्ह्यात गुन्हा केल्याचे समोर आले. त्यामुळे त्यांना नांदेडचे पोलिस ताब्यात घेणार आहेत. विशेष पथकाने या पाचही जणींना ताब्यात घेतल्यानंतर आयुक्तालयाच्या हद्दीत प्रवासादरम्यान दागिने किंवा रोख चोरीला गेलेल्या गुन्ह्यातील तक्रारदारांसोबत संपर्क करण्याचा प्रयत्न केला. या वेळी काही तक्रारदार प्रत्यक्ष पोलिसांकडे आले. पोलिसांनी पकडलेल्या महिला लुटारूंना दाखवले.

# आ. रवि राणा यांच्या प्रयत्नाला आले यश - अमरावती विभागाला लवकरच मिळणार २० नवीन बसेस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावती जिल्हयातील अनेक ग्रामीण भागातील नागरीक एस.टी.महामंडळातील बसेसचा वापर करीत आलेले आहे व आता सुध्दा मोठया प्रमाणात बसच्या माध्यमातुन प्रवास करीत आहे. अनेक नागरीकांकरीता सुलभ व आरामदायक प्रवास या बसेसमुळे होत आलेला आहे. परंतु अमरावती विभागातील गेल्या अनेक वर्षापासुन अतीशय खराब अवस्थेत बस ग्रामीण भागामध्ये धावत असून नागरीकांना व वाहन चालकांना अनेक समस्याला सामोरे जावे लागत असल्याने याचाच अनुभव म्हणुन बडनेरा मतदार संघाचे आमदार रवि राणा यांनी सुध्दा अनेकवेळा प्रवास करतेवेळी एस.टी महामंडळाच्या बसेसने प्रवास केलेला आहे. हा प्रवास करतेवेळी रस्त्यातच बस बंद पडली असतांना व अतीशय खराब अवस्थेत अमरावती जिल्हयातील बसेस असल्याने नागरीकांनी आ.रवि राणा यांना खराब अवस्थेत असलेल्या बसेसचे अनेक उदाहरण देऊन त्यांचे लक्ष वेधले होते.

अमरावती जिल्हयातील नागरीकांची मागणी ही आ.रवि राणा यांनी राज्याचे मुख्यमंत्री.देवेंद्रजी फडणविस व परीवहन मंत्री यांच्याकडे पत्राव्दारे मागणी केली होती. आ.रवि राणा यांच्या मागणीकडे शासनाने गांभीर्याने घेत राज्याचे मुख्यमंत्री व परीवहन मंत्री यांनी पुर्ण करत अमरावती विभागाला २० नवीन बसेस मंजुर करून दिलेल्या आहे. त्यामुळे अमरावती जिल्हयातील नागरीकांना आपला प्रवास नवीन बसेसच्या माध्यमातुन आरामदायक व सुलभ होणार असून लवकरच नवीन बसेस अमरावती जिल्हयातील नागरीकांच्या सेवेत येणार आहे. त्यामुळे आ.रवि राणा यांनी केलेला पाठपुराव्याला यश आले असल्याने आ.रवि राणा यांचे आभार नागरीकांकडुन करण्यात येत आहे. आ.रवि राणा यांचा सुचनेनुसार त्यांचे कार्यालयाचे सचिव उमेश ढोणे हे मुंबई कार्यालयातील व वरीष्ठ अधिकारी तसेच विभाग नियंत्रक,अमरावती यांचेकडे समन्वय ठेवुन आहे.